cmyk

## संपादकीय

### आघाडीचे ऐक्य अबाधित ठेवण्यात यश

गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर राज्यातील महाविकास आघाडीच्या नेत्यांनी राज्यातील ४८ जागांच्या वाटपाचे सूत्र एकत्रितरीत्या जाहीर करून विरोधकांच्या ऐक्याची गुढी उभारली. जागावाटपाचा घोळात घोळ महायुतीला अद्याप संपविता आला नसल्याने राज्यातल्या महाविकास आघाडीने याबाबत तरी महायुतीपेक्षा आघाडी घेतल्याचे चित्र आहे. जागावाटपात उद्धव ठाकरे यांचा गट २१, काँग्रेस १७ व शरद पवारांचा गट १० जागा लढविणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. हे जागावाटपाचे सूत्र पाहता भाजपच्या विरोधातील विरोधकांच्या ऐक्यासाठी काँग्रेसने मन मोठे करून त्याग केल्याचे स्पष्ट होते.


दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-३ | शनिवार दि.१३ एप्रिल २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने- ६ | किंमत ३ रूपये


### आपली ती लेक, दुसऱ्याची ती सून-वाघ

मुंबई : पुरोगामी नेते म्हणून ओळखले जाणारे, आतापर्यंत मुलगा आणि मुलगीमध्ये भेद न करणाऱ्या शरद पवारांनी आता मुलगी आणि सूनेमध्ये फरक केला, हे दुर्दैवी असल्याची टीका भाजपच्या महिला मोर्चाच्या प्रमुख चित्रा वाघ यांनी केला. काहीही झालं तरी बारामतीचा निकाल सूनेच्याच बाजूने लागणार असल्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. अजित पवारांना उत्तर देताना शरद पवारांनी मत पवारांनाच द्या, पण मूळच्या पवारांना द्या असं वक्तव्य शरद पवारांनी केलं होतं. त्यावर चित्रा वाघ यांनी टीका केली.

# पंकजाताई प्रचार दौरा सोडून जरा शेतकऱ्यांचे अश्रु पुसा!

## गारपीटीने हतबल झालेल्या बळीराजाला आधार देण्याची हीच वेळ





**अशोक खाडे । बीड**

**सध्या लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरु असल्याने भाजप महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्याकडून प्रचाराचा धुमधडाका सुरू आहे. प्रचार होईल, मतदान होईल अन् निकालही लागेल पण आज शेतकऱ्यांना मदतीचा हात देण्याची योग्य वेळ आहे. गुरुवारी दुपारनंतर वडवणी, धारुर आणि गेवराई तालुक्यातील काही भागात वादळी वारा, गारांसह जोराचा पाऊस झाला. शेतकरी यामुळे खचला असून पंकजाताईंनी प्रचार दौरा सोडून शेतकऱ्यांचे अश्रु पुसण्यासाठी जावे, अशी मागणी होत आहे. गारपीटीने हलबल झालेल्या शेतकऱ्यांना आधार देण्याची हीच खरी वेळ आहे.**

शेतकरी हा कधी अस्मानी तर कधी सुलतानी संकटाने उध्दवस्त झालेला आहे. आत्महत्या थांबण्याऐवजी त्या वाढतच आहेत. त्यात शासन स्तरावरुन फक्त मलमपट्टी करण्याचे काम केले जाते. यंदा पाऊस कमी झाल्याने फळबागा आणि इतर पिके जगवण्यासाठी शेतकऱ्यांना चांगलीच तारांबळ करावी लागली. त्यात गुरुवारी दुपारनंतर वडवणी, गेवराई आणि धारुर तालुक्यात वारा, पाऊसासह जोरदार गारपीट झाली. यात फळबागा, भाजीपाला पिकांसह इतर पिके जमीनदोस्त झाली. त्यानंतर पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी जिल्हा प्रशासनाला नुकसानीचे पंचनामे करण्याचे तातडीने आदेश दिले. एकीकडे शेतकऱ्यांचे गारपीटीने आतोनात नुकसान झाले असताना दुसरीकडे सर्व पक्षीय नेत्यांचे प्रचार दौरे मात्र जोरात सुरु आहेत. पंकजाताई मुंडे या शुक्रवारी पाटोदा तालुक्याच्या तर बजरंग सोनवणे यांनीही मतदारांमध्ये जावून प्रचार केला. तर वंचित आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे यांनी भेटीगाठीवर भर दिला. निवडणुका आहेत प्रचार केलाच पाहिजे पण आजची शुक्रवारची खरी वेळ प्रचाराऐवजी शेतकऱ्यांना जावून भेटणे, त्यांचे अश्रु पुसणे, त्यांना धीर देणे हे सर्व या उमेदवारांकडून होणे आवश्यक होते. मात्र शेतकऱ्यापेक्षा या नेत्यांनी प्रचार निवडला असल्याने सामान्य नागरीकातून संताप व्यक्त होत आहे.

पंकजाताई मुंडे या लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या कन्या आहेत, राजकीय वारसा त्याच पुढे घेऊन जात आहेत. गोपीनाथ मुंडे यांनी अनेकवेळा अशा अस्मानी संकटात आपले सर्व दौरे रद्द करुन शेतकऱ्यांना आधार दिला, त्यांच्यासोबत रात्र जागून काढली. त्यामुळे पंकजाताई यांच्याकडून तशीच अपेक्षा होती. गारपीट नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना त्यांनी शुक्रवारी जावून भेटण्याची गरज होती. त्या गेल्या असत्या तर हतबल झालेल्या शेतकऱ्यांना थोडी हिमत आली असती, जगण्यासाठी बळ मिळाले असते, लवकर मदत मिळेल असे वाटले असते पण त्या काही गेल्या नाही. नियोजित दौरा होता, अचानक रद्द करावा कसा? यामुळे त्यांनी पाटोदा येथे प्रचार केला असावा. शनिवारी तरी पंकजाताई यांनी प्रचार दौरे रद्द करुन संकटात सापडलेल्या शेतकऱ्याच्या भेटीला जायला हवे, त्यांना धीर द्यायला हवा, मदत कशी मिळेल यासाठी प्रयत्न करायला हवे, अशी अपेक्षा सामान्य शेतकऱ्यांची आहे.

### मुंडे साहेब असते तर थेट बांधावर गेले असते

गोपीनाथ मुंडे आणि शेतकरी यांचे अतुट असे नाते होते. शेतकऱ्यांवर अस्मानी संकट कोसळल्यावर ते सर्व दौरे रद्द करुन शेतकऱ्यांना भेटून धीर देत होते. २००९ च्या लोकसभा निवडणुकीत उन्हाळ्यात अवकाळीने बीड जिल्ह्याला झोडपले होते. त्यावेळी मुंडे यांनी शेतकऱ्यांच्या शेतात जावून त्यांचे दुख जाणून घेतले. त्यांच्यासोबत रात्र जागून काढली. त्यामुळे हीच अपेक्षा पंकजाताईंकडून मुंडे साहेबांवर निस्सीम प्रेम करणाऱ्या असंख्य नागरीकांची आहे.

## माढ्याचा उमेदवार मोहिते पाटील कुटुंबातीलच-शरद पवार



**बारामती । प्रतिनिधी**

**माढा मतदारसंघातील अनेक लोक मला भेटले. त्यांच्याशी झालेल्या चर्चेतून मोहिते पाटील यांचे नाव पुढे आले आहे. येत्या दोन दिवसात धैर्यशील मोहिते पाटील यांचा प्रवेश होईल. त्यानंतर पक्षाकडून उमेदवारीची अधिकृत घोषणा होईल, असे सांगत माढ्याचा उमेदवार मोहिते पाटील घरातीलच असेल असे स्पष्ट संकेत ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी दिले.**

बारामतीत ते पत्रकारांशी बोलत होते. पवार म्हणाले की, माढ्यासंबंधीचा आमचा विचार सुरु आहे. काही प्रस्ताव आले आहेत. गुरुवारी माळशिरस, अकलूज भागातील अनेक पान २ वर

### साताऱ्यात राजा विरुद्ध सामान्य कार्यकर्ता

साताऱ्याच्या जागेचा आमचा उमेदवार पक्षाच्या अध्यक्षांनी जाहीर केला आहे. तिथे शशिकांत शिंदे यांना उमेदवारी दिली आहे. तेथे एका बाजूने राजा तर दुसऱ्या बाजूने माथाडी कामगार म्हणून काम केलेला सर्वसामान्य कुटुंबातील पण कर्तृत्ववान कार्यकर्ता अशी निवडणूक होईल. लवकरच तेथे अर्ज दाखल होतील, असे शरद पवार म्हणाले.

## बीआरएस नेत्या के. कविता यांना १५ एप्रिलपर्यंत सीबीआय कोठडी

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**दिल्लीतील राऊस ॲव्हेन्यू न्यायालयाने मद्य धोरण घोटाळा प्रकरणी बीआरएस नेत्या के. कविता यांना १५ एप्रिलपर्यंत ३ दिवसांची सीबीआय कोठडी सुनावली आहे. के. कविता यांना १५ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता न्यायालयात हजर केले जाणार आहे.**



केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) तिहार तुरुंगात असलेल्या भारत राष्ट्र समितीच्या नेत्या के. कविता यांना दिल्ली मद्य धोरण घोटाळ्याची संबंधित मनी लाँड्रिंग प्रकरणात गुरुवारी (दि.११ एप्रिल) अटक केली होती. त्यानंतर शुक्रवारी (दि.१२) त्यांना दिल्लीच्या राऊस एव्हेन्यू न्यायालयात हजर करण्यात आले. सीबीआयने के. कविता यांच्या पाच दिवसांच्या कोठडीची मागणी करणारा अर्ज दाखल केला होता. पण सीबीआयच्या याचिकेवर दिल्ली न्यायालयाने के. कविता यांना ३ दिवसांची सीबीआय पान २ वर

## गेवराईत माई लेकाच्या अंगावर विज पडून महिलेचा मृत्यू

### परळीतही दोन ठिकाणी विज पडून दोन जनावरे दगावली

**गेवराई- परळी । प्रतिनिधी**

**गेल्या तीन दिवसापासून अवकाळी पावसाने बीड जिल्ह्यामध्ये हाहाकार माजवला आहे. गारपिटीने क्षणात होत्याचे नव्हते झाले. शुक्रवारी गेवराई तालुक्यातील मण्यारवाडी येथे मायलेकाच्या अंगावर वीज पडून यात ३५ वर्षीय महिलेचा मृत्यू झाला तर मुलगा गंभीर जखमी झाला आहे. तसेच परळी तालुक्यात दोन ठिकाणी वीज पडून एक बैल आणि एका म्हशीच्या वगाराचा मृत्यू झाल्याची घटना घडली.**



बीड जिल्ह्याला अवकाळी ने सलग तिसऱ्या दिवशीही झुडपले आहे, गुरुवारी झालेल्या गारपिटीमुळे वडवणी, धारूर आणि गेवराई तालुक्यातील शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. शुक्रवारी गेवराई तालुक्यातील मन्यारवाडी शिवारात दुपारी चार वाजता मायलेकाच्या अंगावर विज पडली. यात ३५ वर्षीय मीना गणेश शिंदे यांचा जागीच मृत्यू झाला तर त्यांचा पंधरा वर्षीय मुलगा ओंकार गणेश शिंदे हा गंभीर जखमी झाला आहे. त्याला पुढील उपचारासाठी बीड येथील जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. या घटनेमुळे पान २ वर

## मोदींना देश तोडायचाय

**चंद्रपूर । वृतसंस्थस**

राजकीय पक्ष हे भारताच्या एकतेचे प्रतीक आहेत, असे मी मानतो. ही प्रतिके नरेंद्र मोदी संपवायला निघाले आहेत. मोदींना देश तोडायचा असल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी चंद्रपूर येथील पत्रकार परिषदेत केला.

प्रकाश आंबेडकर पुढे बोलताना म्हणाले, पंतप्रधान मोदी म्हणतात की पुढच्या पाच वर्षांत मीच सत्तेवर येणार, काँग्रेसने पान २ वर

## अवकाळी पावसाचा मुक्काम आणखी काही दिवस

### हवामान विभागाने वर्तविला अंदाज

**पुणे । प्रतिनिधी**

**मागील काही दिवसांपासून अवकाळी पावसाने हजेरी लावत आधीच उन्हाच्या तडाक्याने हैराण झालेल्या शेतकऱ्यांना चांगलाच तडाखा देण्यास सुरुवात केली आहे. रब्बी हंगामात हाता तोंडाशी आलेले पीक हातचे वाया जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यातच भारतीय हवामान खात्याने इशारा देत आणखी काही दिवस अवकाळी पाऊस राहणार असल्याचा अंदाज व्यक्त केला.**

भारतीय हवामान खात्याने व्यक्त केलेल्या अंदाजानुसार दक्षिण कोंकण, मध्य महाराष्ट्रातील, विदर्भ, मराठवाड्यातील काही जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस पडणार असल्याचा इशारा दिला. तर मालेगांव मध्ये कमाल तापमान ४२ अंश सेल्सियस तर नागपूरमध्ये किमान तापमान १९ अंश सेल्सियस राहणार असल्याचा अंदाजही यावेळी व्यक्त केला. १३ एप्रिल २०२४ रोजी बीड, सोलापूर, लातूर, उस्मानाबाद, नांदेड, अमरावती, परभणी, हिंगोली, वाशिम, बुलढाणा, वर्धा, यवतमाळ, चंद्रपूर, गोंदिया, गडचिरोली, भंडारा आदी जिल्ह्यात अवकाळी पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. १४ एप्रिल २०२४ रोजी यवतमाळ, चंद्रपूर, नागपूर, अमरावती, गोंदिया, भंडारा, गडचिरोली पान २ वर

## अमित शाहांच्या गाडीत अस्सल भाजपवाले किती?

### हा भाड जनता पक्ष; उद्धव ठाकरेंचा कडाडून हल्लाबोल

**पालघर । प्रतिनिधी**

**नकली शिवसेना म्हणून चेष्टा करत आहेत, पण ती तुमची डिग्री आहे का? अशा शब्दात शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी पीएम मोदींवर हल्लाबोल केला. दुसरे एक (अमित शाह) खंडणीबहाद्दर पक्षाचे महाराष्ट्रात आले आणि ते सुद्धा म्हणाले, बाळासाहेब ठाकरेंनी भूमिपुत्रांच्या हक्कासाठी शिवसेना स्थापन केली होती ती शिवसेना तुम्ही संपवायला निघाला आहात. मात्र, आज कोण आहेत त्यांच्यासोबत? अमित शाहांच्या गाडीत अस्सल भाजपवाले किती? तुमच्या स्टेपण्या किती आत आहेत ते बघा, हा भाड जनता पक्ष असल्याची घणाघाती टीका उद्धव ठाकरे यांनी केली.**

महाविकास आघाडीच्या पालघर लोकसभेच्या उमेदवार भारती कामडी यांच्या प्रचारार्थ आयोजित केलेल्या सभेत उद्धव ठाकरे बोलत होते. उद्धव ठाकरे म्हणाले की, सगळे विध्वंस करणारे उद्योग हे महाराष्ट्राच्या माथी मारायचे आणि चांगले उद्योग हे गुजरातला पळवायचे. मोदीजी तुम्ही गुजरातचे पंतप्रधान नाही, तुम्ही देशाचे पंतप्रधान आहात याची जाणीव ठेवा असे ते म्हणाले. यावेळी ठाकरे यांनी माझ्यासाठी तुमची मते नसतील, तर आशीर्वाद आहे. मी आशीर्वाद मानतो म्हणून माझ्याकडून पक्ष, चिन्ह सगळे जरी काढले तरी सुद्धा तुमचे आशीर्वाद हे आई जगदंबेच्या रूपात माझ्यासमोर उभे आहेत, असे ते म्हणाले. ते म्हणाले की, पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१२ एप्रिल २०२३

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : २४.०० क्विंटल | २,२२१ | ३,०३६ | २,५३५ |
| ज्वारी/हायब्रिड :२८३.५० क्विंटल | १,५०० | ३,८१२ | २,७४८ |
| मूग :०.५० क्विंटल | ९,२०१ | ९,२०१ | ९,२०१ |
| तूर : ६२.५० क्विंटल | ६,५०० | १०,८०० | १०,२३५ |
| उडीद : १.५० क्विंटल | ५,००० | ६,५०१ | ५,७५० |
| बाजरी: १८.५० क्विंटल | २,००० | २,७११ | २,४७९ |
| चिंचोका/लोकल: ८.०० क्विंटल | २,४०० | २,४०० | २,४०० |
| सोयाबीन: २५३.०० क्विंटल | ४,६०० | ४,७०१ | ४,६६८ |
| हरभरा: १३.५० क्विंटल | ५,५६१ | ५,५६१ | ५,५६१ |


## यंदा ५ हजार टन आंबा निर्यात होणार

### कोकण, मराठवाड्यातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांना फायदा

**पुणे । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाने दिलेल्या माहितीनुसार ५ हजार टन निर्यातीचे उद्धीष्ट मार्केट कमीटीचे आहे. मंडळाचे व्यवस्थापकीय संचालक संजय कदम यांनी एका मुलाखतीमध्ये अमेरिका आणि युरोपसारख्या विकसित राष्ट्रांमध्ये निर्यात करण्याचे त्यांचे उद्दिष्ट आहे. असे म्हटले आहे. त्यामुळे आंदा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे.**

महाराष्ट्रात मागच्या वर्षीच्या सिझनमध्ये आंबा उत्पादक शेतकरी संकटात होते परंतु यंदा परिस्थिति थोडी बदलल्याचे दिसून येत आहे. अवकाळी पाऊस आणि किडीचा प्रादुर्भाव कमी झाल्याने हापूस आणि केसर आंबा उत्पादन चांगल्या पद्धतीचे झाल्याचे बोलले जात आहे. कोकणात आंब्याचे



उत्पादन वाढल्याने दरही काहीसे कमी असल्याचे सध्या बाजारात दिसून येत आहे. तसेच उत्तम प्रतिच्या आंब्याला परदेशात मागणी वाढली आहे.

या वर्षी आंब्याचा हंगाम चांगला सुरू झाला असून, अनुकूल हवामानामुळे चांगले पीक येण्याची आशा शेतकऱ्यांना आहे. कोकण विभागातील उत्पादक विशेषतः उत्साही आहेत. मुळात कर्नाटकातून येणारे आंबे अद्यापही मोठ्या प्रमाणात बाजारात उपलब्ध झाले नाहीत. ज्यामुळे हंगामाच्या सुरुवातीला महाराष्ट्राच्या कोकणातील हापूस केसर या प्रमुख जाती निर्यातीस जात आहेत. वाशी बाजारसमितीमधून हा आंबा परदेशात निर्यात होणार आहे.

कदम म्हणाले की, यूएस फायटोसॅनिटरी इन्स्पेक्टर १० एप्रिल रोजी येणे अपेक्षित आहे, त्यानंतर यूएसमध्ये पूर्ण निर्यात सुरू होईल. डाळिंबाच्या निर्यातीवर देखरेख ठेवणाऱ्या पूर्वीच्या निरीक्षकाने यापूर्वीच ४२५ टन आंब्याच्या निर्यातीला ग्रीन सिग्नल दिला आहे. भारतीय शेतकरी २.४ लाख हेक्टरवर आंबा पिकवतात आणि अंदाजानुसार, या हंगामात २१.७९ दशलक्ष टन आंब्याचे उत्पादन होईल. २०२२-२३ या आर्थिक वर्षात भारताने २२९६३.७६ टन फळांची निर्यात केली होती.

#### कोकण, मराठवाड्याला फायदा

भारतीय आंबे, विशेषतः कोकणातील हापूस, मराठवाड्यातील केसर तसेच गुजरातमधील आंबे हे निर्यातीचे आंबे आहेत. महाराष्ट्रातील बराच आंबा हा आखाती देशामध्ये जातो. परंतु बहुतेक शेतकरी आणि निर्यात हे विकसित देशांना लक्ष्य करतात कारण परतावा चांगला असतो. वाढत्या निर्यातीमुळे कोकण आणि विशेष करून मराठवाड्याती शेतकऱ्यांना याचा फायदा होईल.

## नुकसानीचे तात्काळ पंचनामे करा-परमेश्वर सातपुते

**बीड । प्रतिनिधी**



जिल्ह्यातील काही गावात काल परवा झालेल्या गारपीटीने शेतकऱ्यांचे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे अवकाळी पावसामुळे फळबागांचे विशेष करून आंब्यासह मोसंबी, डाळिंबाचे खूप नुकसान झाले डोंगर पट्ट्यातील उन्हाळी बाजरी जमीनदोस्त झाली आधीच शेतकऱ्यांच्या मालाला भाव नाही अनेक शेतकऱ्यांचे सोयाबीन, कापूस घरात ठेवलेलं आहे परवडणारा भाव नसल्या मुळे बाजारात विकता येत नाही अशा आर्थिक संकटात असताना ह्या गारपीटीने शेतकरी अक्षरशः देशो धडीला लागण्याची वेळ आली आहे पालकमंत्री आणि जिल्हा प्रशासन निवडणुकीत मग्न असून त्यांना नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतीला भेट देऊन पाहणी करण्यासाठी वेळ नाही गारपीटीने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या शेतांचे लवकरात लवकर पंचनामे करून त्यांना तात्काळ मदत करावी अन्यथा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल असे दिलेल्या प्रसिद्धी पत्रकाद्वारे शिवसेना जिल्हा प्रमुख परमेश्वर सातपुते यांनी केले आहे.

cmyk

## अग्रलेख

# आघाडीचे ऐक्य अबाधित ठेवण्यात यश

गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर राज्यातील महाविकास आघाडीच्या नेत्यांनी राज्यातील ४८ जागांच्या वाटपाचे सूत्र एकत्रितरीत्या जाहीर करून विरोधकांच्या ऐक्याची गुढी उभारली. जागावाटपाचा घोळात घोळ महायुतीला अद्याप संपविता आला नसल्याने राज्यातल्या महाविकास आघाडीने याबाबत तरी महायुतीपेक्षा आघाडी घेतल्याचे चित्र आहे. जागावाटपात उद्धव ठाकरे यांचा गट २१, काँग्रेस १७ व शरद पवारांचा गट १० जागा लढविणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. हे जागावाटपाचे सूत्र पाहता भाजपच्या विरोधातील विरोधकांच्या ऐक्यासाठी काँग्रेसने मन मोठे करून त्याग केल्याचे स्पष्ट होते.

उद्धव ठाकरे व शरद पवार या दोघांच्याही पक्षात उभी फूट पडली. मात्र, काँग्रेसने आपल्या पक्षात अशी उभी फूट पडू दिली नाही. त्यामुळे जागावाटपात महाविकास आघाडीत काँग्रेसच मोठा भाऊ ठरावा, हीच राज्यातील काँग्रेसजनांची स्वाभाविक इच्छा असणे साहजिकच. मात्र, उद्धव ठाकरे यांनी आक्रमक भूमिका घेत राज्यातील विरोधकांच्या आघाडीत आपणच मोठा भाऊ असल्याचे सिद्ध केले. काँग्रेसच्या हायकमांडने विरोधकांच्या ऐक्यासाठी मन मोठे केले नसते तर हे शक्य नव्हतेच. मात्र, त्यागाची ही भूमिका स्थानिक नेते व कार्यकर्त्यांमध्ये झिरपण्यास थोडा काळ लागण्याचीच चिन्हे दिसत आहेत. सांगलीची जागा उद्धव ठाकरे गटाकडेच राहिली तर मुंबईतल्या हव्या त्या चार जागा मिळविण्यात उद्धव ठाकरे यशस्वी ठरले. मुंबईतील दक्षिण मध्य मुंबईची जागा ठाकरे यांच्याकडे गेल्याने काँग्रेसच्या वर्षा गायकवाड नाराज झाल्याचे व त्यांनी थेट दिल्ली दरबारी तक्रार केल्याचे वृत्त आहे. तर सांगलीत विश्वजीत कदम व विशाल पाटील काय भूमिका घेतात याची प्रतीक्षा आहे. जागावाटपानंतर काही ठिकाणी नाराजी दिसत असली तरी आम्ही संबंधित स्थानिक नेत्यांची समजूत काढू असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी सांगितले.

विरोधकांच्या व्यापक ऐक्यासाठी पक्षनेतृत्वाने मन मोठे करणे गरजेचे असते व तसे ते करून काँग्रेसने राज्यातील महाविकास आघाडीचे ऐक्य टिकवण्यात यश मिळवले, हे मान्यच करावे लागेल. इंडिया आघाडीतील पक्ष इतर राज्यांमध्ये परस्परांच्या विरोधात लढतानाचे चित्र दिसत असताना महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे ऐक्य अबाधित ठेवण्यात यश मिळणे ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. याचा धसका महायुतीने नक्कीच घेतला असेल कारण महायुतीतील तीन ते चार जागांवरचा तिढा सुटण्याऐवजी वाढतच चालला आहे व त्यावरून तीन पक्षांमधील धुसफूस रोजच बाहेर येते आहे. हे होणे साहजिक व त्यावरही तोडगा काढला जाईलच पण ऐक्याच्या प्रदर्शनात महाविकास आघाडीने आघाडी घेतली व त्यात काँग्रेसने मन मोठे करून मोलाची भूमिका बजावली, त्याबद्दल काँग्रेसचे अभिनंदन करायला हवे. वाद मागे टाकून भाजपविरोधात एकीने लढण्याचा निर्णय महाविकास आघाडीने घेतला हे चांगलेच झाले. मात्र, यासोबतच राज्यात भाजपविरोधात जी सोशल इंजिनीअरिंगची संधी होती ती साधण्यात मात्र महाविकास आघाडी हुकली.

वंचित बहुजन आघाडीला सोबत घेण्यात महाविकास आघाडीला यश आले असते तर विरोधकांच्या भाजपविरोधी ऐक्याला एक वेगळाच भरीवपणा आला असता. प्रकाश आंबेडकर यांचा आजवरचा प्रवास पाहता त्यांनी घेतलेल्या भूमिकेचा महाविकास आघाडीच्या नेत्यांना अगोदरच अंदाज आला असणारच. मात्र, अन्य पक्षांना सोबत घेण्यासाठी जी लवचिकता दाखवायला हवी ती दाखविण्यात महाविकास आघाडीचे नेते यशस्वी ठरले नाहीत. त्यामुळे राज्यात भाजपविरोधातील विरोधकांच्या बेरजेच्या राजकारणात काही फटी राहिल्याच हे मान्य करावेच लागेल. दिंडोरीसारख्या ठिकाणी डाव्या पक्षांना एखादी जागा सोडणे किंवा राजू शेट्टी यांच्याविरोधात उमेदवार न देणे किंवा प्रकाश आंबेडकर यांच्या विरोधात उमेदवार न उतरवणे यात महाविकास आघाडीच्या नेत्यांनी फारसा उत्साह दाखविला नाही. आंबेडकरी विचारसरणीच्या छोट्या-मोठ्या नेत्यांना सोबत घेण्यासाठी काही विशेष प्रयत्न झाल्याचे दिसले नाही. महाविकास आघाडीने हे सोशल इंजिनीअरिंग साधले असते तर विरोधकांच्या ऐक्याला आणखी भरीवपणा आला असता हे नक्की. असो! किमान जागावाटपात आघाडी घेण्यात महाविकास आघाडीला यश आले हे ही नसे थोडके! आता महाविकास आघाडीने एकत्रित सभा, रॅलींचा धडाका लावून राज्यातील प्रचारातही आघाडी घ्यायला हवी. याबाबत आघाडीत अद्याप गती आलेली दिसत नाही.

## महिला आत्मभान प्रशिक्षण शिबीराचे आयोजन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

श्री योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित योगेश्वरी क्रीडा प्रबोधिनी आणि कमल खुरसाळे स्मृती न्यास यांच्या वतीने येत्या ०१ मे ते ०८ मे२०२४ दरम्यान महिला आत्मभान प्रशिक्षण शिबीराचे गोदावरीबाई कुंकूलोळ योगेश्वरी कन्या विद्यालयात आयोजन करण्यात आले आहे. महिला सबलीकरण व सक्षमीकरण या उद्देशातून २०१० पासून हे महिला आत्मभान प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्यात येते हे शिबीराचे पंधरावे वर्ष असून या शिबीरात इयत्ता आठवी व त्यानंतरच्या मुलींना योगासन ,तायक्कांदो, प्राणायाम,ज्युदो,कराटे, लाठी काठी,नेमबाजी, आणि तलवार बाजीचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे या शिबीरात मान्यवरांची सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत स्फूर्तीदायी व्याख्यानेही होणार आहेत युवतींच्या व्यक्तीमत्व विकासाला हे शिबीर पोषक ठरेल याचे महत्व जाणून घेण्यासाठी युवतींच्या पालकांसाठी संवाद बैठकीचे सोमवार दि.२२ एप्रिल२०२४ रोजी दुपारी १२ वाजता श्रीमती गो.कु.यो.कन्या विद्यालयात आयोजन करण्यात आले असून इच्छुक पालकांनी उपस्थित रहावे व अधिकाधिक युवतींना शिबीरात सहभागी होण्यासाठी प्रवृत्त करावे शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुरेश खुरसाळे यांच्यासह पदाधिकारी व संचालक मंडळाच्या वतीने केले आहे.

# बजाज फायनान्सतर्फे मुदत ठेवींच्या व्याजदरात ६० अंशांपर्यंत वाढ

## ज्येष्ठ नागरिकांसाठी ४२ महिन्यांच्या मुदत ठेवींवरील व्याजदर हा सर्वाधिक ८.८५ टक्क्यांवर

### सर्वोच्च दर ८.८५ % पासून प्रारंभ

**बीड । प्रतिनिधी**

**देशातील सर्वात मोठ्या वित्तीय सेवा समूहांतील बजाज फिनसर्व्हचा एक मुख्य भाग असलेल्या बजाज फायनान्स लिमिटेडने आपल्या मुदत ठेव (एफडी) योजनांच्या बहुतांश कालावधीसाठी व्याजदरात वाढीची महत्वपुर्ण घोषणा केली. कंपनीने ज्येष्ठ नागरिकांसाठी २५ ते ३५ महिन्यांच्या कालावधीतील मुदत ठेवींच्या व्याजदरात ६० अंशांपर्यंत (०.६ टक्क्यांपर्यंत) वाढ केली आहे. तर १८ ते २४ महिन्यांच्या कालावधीसाठी व्याजदरात ४० अंशांपर्यंत (०.४ टक्क्यांपर्यंत) वाढ केली आहे. ही दरवाढ ३ एप्रिल २०२४ पासून अंमलात आली आहे.**

बिगर ज्येष्ठ नागरिकांसाठी, २५ ते ३५ महिन्यांच्या कालावधीतील ठेवींसाठी व्याजदर ४५ अंशांपर्यंत (०.४५ टक्क्यांपर्यंत) वाढवण्यात आले आहेत. तर १८ आणि २२ महिन्याच्या कालावधीसाठी व्याजदर ४० अंशाने (०.४० टक्क्यांनी) तर ३० आणि ३३ महिन्याच्या कालावधीसाठी ३५अंशांनी (०.३५ टक्क्यांनी) व्याजदर वाढवण्यात आले आहेत. कंपनीचे हे पाऊल बाजारातील सध्याच्या परिस्थितीत स्थिर आणि उत्तम परतावा मिळवण्याची संधी बचत करणाऱ्या व्यक्तींना देत आहे. ज्येष्ठ नागरिक त्याच्या डिजिटल मुदत ठेवींसाठी ८.८५ टक्क्यांपर्यंत व्याजदर मिळवू शकतात, तर बिगर ज्येष्ठ नागरिक ४२ महिन्यांच्या कालावधीसाठी डिजीटल मुदत ठेव योजनांकरिता ८.६० टक्क्यांपर्यंत व्याजदरांचा लाभ घेऊ शकतात. बजाज फायनान्सच्या मुदत ठेवी आणि गुंतवणूक विभागाचे प्रमुख सचिन सिक्का म्हणाले, ''स्थिरता शोधणाऱ्या गुंतवणूकदारांसाठी ठेवींच्या अनेक गुंतवणूक प्रकारांत व्याजदर वाढवत आम्ही आकर्षक प्रस्ताव सादर केलेले आहेत. गेली अनेक वर्ष लाखो ठेवीदारांनी बजाज ब्रॅण्डवर त्यांचा दृढ विश्वास कायम ठेवलेला आहे. त्यांना उत्तम अनुभव प्रदान करत राहणे, अधिक मूल्य सादर करणे आणि गुंतवणूकीसाठी सुरक्षित असा पर्याय देणे यावर आमचे लक्ष सतत केंद्रीत राहणार आहे. बजाज फायनान्सच्या ३१ मार्च २०२४ अखेर ८३.६४ दशलक्ष ग्राहक फ्रँचाईझी कार्यरत आहेत. तसेच बजाज फायनान्स ३१ मार्च २०२४ अखेर देशातील सर्वात मोठी ठेव संकलन करणारी एनबीएफसी कंपनी ठरली आहे. ३१ मार्च २०२४ पर्यंत कंपनीच्या एकूण ठेवींची रक्कम ६०,००० कोटी रुपये इतकी आहे. बजाज फायनान्सच्या ॲपवर ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत एकूण ४९.१९ दशलक्ष वापरकर्ते होते. या संस्थेच्या अहवालानुसार बजाज फिनसर्व्ह ॲप हे भारतात वर वित्तीय डोमेनमध्ये सर्वाधिक डाउनलोड झालेले चौथ्या क्रमांकाचे ॲप ठरले आहे. बजाज फायनान्सच्या मुदत ठेव योजनांना क्रिसीलच्या /स्टेबल आणि इक्राच्या (स्टेबल) असे सर्वोच्च स्थिरतेचे रेटिंग (मानांकन) प्रदान झालेले आहे, हे रेटींग कंपनीच्या ठेवी या गुंतवणूकदारांसाठी सर्वात सुरक्षित गुंतवणूक पर्याय असल्याचे सूचित करते. कंपनीचे ॲप गुंतवणूकीसाठी एक उत्तम मंच ठरला आहे. या ॲपवर ग्राहक म्युच्युअल फंडांच्या विस्तृत श्रेणींची निवड करुन आपली गुंतवणूकसुध्दा सुरु करू शकतात.

## डॉ.बी.आर आंबेडकर सेंट्रल लायब्ररी बीड आणि भारतीय धम्म महासंघ बीड यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले यांना अभिवादन



**बीड प्रतिनिधी**

**डॉ. बी.आर.आंबेडकर सेंट्रल लायब्ररी बीड व भारतीय धम्म महासंघ, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची १९७ वी जयंती डॉ.बी.आर. आंबेडकर सेंट्रल लायब्ररी बीड येथे अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी क्रांतीसुर्य महात्मा फुले आणि सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले.**

सतीश कापसे आणि मस्के यांनी महात्मा फुले आणि सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमांना विनम्र अभिवादन केले. जयंतीनिमित्ताने कापसे साहेब, बी. आर. गायकवाड आणि एस. एम. जोगदंड यांनी ज्योतिबा फुले यांच्या कार्याविषयी समयोचित मनोगत व्यक्त केले. सूरेश कांबळे यांनी आभार व्यक्त केले. या कार्यक्रमाला पी.एस. वडमारे, सुनील जाधव, सुरेश कांबळे, आजीनाथ माने, भिवाजी जोगदंड व मस्के साहेब यांनी उपस्थित राहून विनम्र अभिवादन केले.

# संस्कार इंग्लिश स्कूलमध्ये नवोदय धारक विद्यार्थ्यांचा सत्कार संपन्न

**चौसाळा प्रतिनिधी**

**आदर्श बहुउद्देशीय सेवाभावी सामाजिक संस्था चौसाळा संचलित संस्कार इंग्लिश स्कूल चौसाळा च्या वतीने शाळेतील नवोदय धारक विद्यार्थी व चौसाळ्या चे भूमिपुत्र रिसोड (जिल्हा-वाशीम) येथे गट विकास अधिकारी म्हणून कार्यरत असणारे उदय बाळासाहेब जाधव यांची सहाय्यक प्रकल्प अधिकारी म्हणून निवड झाल्या बद्दल सत्कार करण्यात आला. येथील प्राथमिक केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ.वैभव मोटे, वैद्यकीय अधिकारी डॉ.अंकुश मंचुके, प्रा.श्रीधर (बापू) ढास, संस्थेचे उपाध्यक्ष लक्ष्मण तोडकर, कोषाध्यक्ष विकास तोडकर यांच्या हस्ते हा सत्कार संपन्न झाला.**



संस्कार इंग्लिश स्कूल चौसाळा येथील सन २०२३ मध्ये २ विद्यार्थी व २०२४ मध्ये संस्कार अकॅडमी मधील संस्कार इंग्लिश स्कूल मधील ३ व इतर शाळेतील २ अशा एकूण ५ विद्यार्थ्यांची निवड नवोदय करिता झाली. त्या मध्ये विरेन विकास माने, पियूष सतीश तोडकर, अर्णव आप्पासाहेब सुरवसे, आरोही बाबासाहेब शेंडगे, अनुष्का सतीश तोडकर या नवोदय धारक विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. याशिवाय मुख्याध्यापिका सौ.मीनाक्षी माळकर, सौ.सोनाली तोडकर, सौ. जया सोनवणे, सौ.स्नेहा कळसकर यांच्या बरोबरच शाळेतील सर्व शिक्षकांचा सत्कार नवोदय धारक विद्यार्थ्यांच्या पालकांकडून करण्यात आला. सत्कार मूर्ती उदय जाधव यांनी विद्यार्थ्यांनो सतत अभ्यास करत रहा. यश तुम्हाला नक्की मिळेल अशी विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली. डॉ. मंचूके यांनी शाळेच्या प्रगती बाबत समाधान व्यक्त करत यशस्वी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. तसेच प्रा.श्रीधर (बापू) ढास यांनी ग्रामीण भागात गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळत असल्याबद्दल मुख्याध्यापक व सर्व शिक्षकांचे कौतुक केले. यावेळी सर्व नवोदय धारक विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले व विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली. पालकांच्या वतीने सौ.दिपाली शेंडगे मॅडम यांनी शाळेने घेतलेल्या अथक परिश्रमा बद्दल शिक्षकांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ.बाबासाहेब शेंडगे, संस्थेचे उपाध्यक्ष लक्ष्मण तोडकर, कोषाध्यक्ष विकास तोडकर, संस्थेच्या सचिव तथा मुख्याध्यापिका मीनाक्षी माळकर, शाळेतील सर्व शिक्षक स्टाफ तसेच संस्कार फॅमिली मधील सर्व पालक वर्ग याचे सहकार्य लाभले.

# सावरगाव (चकला)च्या सरपंच सागरबाई खेडकर आदर्श सरपंच पुरस्काराने सन्मानित

## दै.लोकतंत्रने केला गौरव

**शिरूर । प्रतिनिधी**

**तालुक्यातील सावरगाव (चकला) या गावच्या महिला सरपंच सौ.सागरबाई शहादेव खेडकर यांना दैनिक राज्य लोकतंत्रच्या वतीने दिला जाणारा आदर्श सरपंच पुरस्कार जाहीर झाला असून सोमवार दि.८ एप्रिल रोजी आयुष्मान भारत महाराष्ट्र समितीचे प्रमुख ओमप्रकाश शेटे, बीडचे पोलीस अधिक्षक नंदकुमार ठाकूर मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आल्याने शिरूर तालुक्यामध्ये खेडकर यांच्या वरती सर्व स्तरातून अभिनंदन शुभेच्छाचा वर्षाव होत आहे.**

शिरूर कासार तालुक्यातील मौजे सावरगाव (चकला ) ही ग्रामपंचायत विधान परिषदचे आ. सुरेश धस यांच्या राजकीय प्रस्ताखाली माजी सरपंच तथा पॅनल प्रमुख शहादेव खेडकर हे दहा वर्षापासून गावचे कारभारी म्हणून काम पाहत आहेत. पहिली पाच वर्ष शहादेव खेडकर हे सरपंच राहिल्याने त्यांनी अनेक विकास कामाला हात घालून विकासाची गंगोत्री गावात ओढून आणली आहे. सहाजिकच त्यांची दुसऱ्या टर्मला त्यांची विकाकभीमूख प्रतिमा त्यांच्या प्रचाराची नांदी ठरली होती. यामुळे दुसऱ्यांदाही गावकऱ्यांनी सरपंचपदही सौ.सागरबाई शहादेव खेडकर यांच्या पदरात पाडून विकासाला गती मिळावी यासाठी आपला कौल दिला. गावातील जनता जनार्दन आपल्या पाठीशी मोठा विश्वास ठेवून आहे मग विकास कामाला गती तर पाहिजे या इर्षेतून शहादेव खेडकर यांना गेल्या काही महिन्यात विकास कामे ओढून आणण्यासाठी धडपड चालू आहे. गावासाठी केलेल्या आदर्श कामाची दैनिक राज्य लोकतंत्रने दखल घेत त्यांना यावर्षीचा आदर्श शिक्षक पुरस्कार दिला असून या पुरस्कारामुळे शहादेव खेडकर यांची राजकीय प्रतिमा अधिकच उंचावली आहे. शहादेव खेडकर यांच्या पत्नी सौ.सागरबाई खेडकर यांना आदर्शसरपंच पुरस्कार जाहीर झाल्याने तालुक्यातून सर्व स्तरांमधून खेडकर परिवारावर शुभेच्छा अभिनंदनचा वर्षाव होताना पहायला मिळत आहे.



## पान १वरून...

### गेवराईत माई लेकाच्या अंगावर

मन्यारवाडी ग्रामस्थांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. परळी तालुक्यातही दोन गावांमध्ये वीज कोसळल्या. कानडी येथील शेतकरी भास्कर संभाबुवा पुरी यांच्या बैलाच्या अंगावर वीज कोसळली. यात बैलाचा मृत्यू झाला आहे. पाडोळी येथील शेतकरी प्रदीप बाबुराव कदम यांच्या म्हशीच्या अंगावर विज पडल्याने त्यात म्हैस दगावली. नुकसानीचे पंचनामे करून तात्काळ भरपाई द्यावी अशी मागणी आता शेतकरी करत आहेत.

-------------

### बीआरएस नेत्या के. कविता यांना

कोठडी सुनावली आहे. दरम्यान, के कविता यांच्या वकिलाने सीबीआयने केलेली त्यांची अटक ''बेकायदेशीर'' असल्याचा दावा केला. तसेच त्यांनी तपास यंत्रणेवर मूलभूत अधिकारांचे उल्लंघन केल्याचा आरोप केला. दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर न्यायालयाने निर्णय राखून ठेवला होता. काही तासांनतर दिल्लीतील राऊस अव्हेन्यू न्यायालयाने के. कविता यांना १५ एप्रिलपर्यंत सीबीआयच्या ताब्यात दिले. त्यामुळे के कविता यांचा १५ एप्रिलपर्यंतचा मुक्काम आता सीबीआय कोठडीत असणार आहे. आता के. कविता यांना सीबीआय मुख्यालयात नेऊन तिथे त्यांची चौकशी केली जाईल. यापूर्वी सीबीआयने ६ एप्रिल रोजी तिहारमध्ये कविता यांची चौकशी केली होती. दरम्यान, आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात कविता २६ मार्चपासून न्यायालयीन कोठडीत होत्या. तर सीबीआयने के. कविता यांची कोठडीत चौकशीची मागणी करताना सांगितले की त्यांनी दिल्ली मद्य धोरण प्रकरणात आम आदमी पक्षाला लाच देण्याबाबतच्या प्रश्नावर समाधानकारक उत्तर दिलेले नाहीत.

-----------

### माढ्याचा उमेदवार मोहिते

सहकारी भेटले. त्यांनी धैर्यशील यांचे नाव दिलेले आहे. यासंबंधीचा निर्णय येत्या एक दोन दिवसांत होईल. पक्षाचे अध्यक्ष व काही वरिष्ठ नेते अकलुजला जातील. पहिल्यांदा पक्ष प्रवेश होईल. पक्ष प्रवेश झाल्याशिवाय उमेदवारी जाहीर करता येत नाही. ती जाहीर करण्याची जबाबदारी आम्हा लोकांवर आहे. त्या मतदारसंघात तरुणांचा, वडीलधाऱ्यांचा मोठा पाठिंबा दिसत आहे. आम्हा सर्वांसमोर आलेल्या मतामध्ये मोहिते पाटील यांच्या नावाला अनुकुलता दिसत आहे. पक्ष प्रवेशानंतर उमेदवारी जाहीर करत प्रचार मोहीम सुरु करू.

-------------

### मोदींना देश

२०२९ च्या निवडणुकीची तयारी करावी. दुसऱ्या बाजूस सत्तेत नसणारी काँग्रेस देश फोडणार असाही प्रचार चालू आहे. देशाचा एकोपा जो आहे यातील सर्वांत महत्वाचा घटक म्हणजे राजकीय पक्ष असल्याचेही सांगितले. पुढे बोलताना ॲड. प्रकाश आंबेडकर म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी हे भारतीय जनता पक्षाचे सरकार असे संबोधित नाहीत. कोणतीही योजना आली की, ती सरकारची आहे असे न मांडता ती नरेंद्र मोदींची आहे अशी मांडली जाते. ज्यांनी काँग्रेस संपवायची गोष्ट केली, त्यांनी स्वतःहून भारतीय जनता पक्ष संपवण्याचा मार्ग अवलंबल्याचा आरोप त्यांनी केला. प्रकाश आंबेडकर पुढे बोलताना म्हणाले की, आरएसएसशी आमचे मतभेद कायम आहेत. पण मी मोहन भागवतांना विचारतो की, मागील अडीच वर्षांत आपण किती वेळा नरेंद्र मोदी यांच्याकडे वेळ मागितला किंवा त्यांना तुम्ही सांगितले आहे की, आपण भेटले पाहिजे, असा सवालही यावेळी मोहन भागवतांनी केला.

**मोदिंच्या कार्यकर्त्यांनी स्वतःलाच प्रश्न विचारावेत**

पुढे बोलताना प्रकाश आंबेडकर म्हणाले की, या अडीच वर्षांत नरेंद्र मोदी आणि त्यांचा जो कार्यकर्ता आहे, त्यांनी स्वतःलाच प्रश्न विचारला पाहिजे की, नरेंद्र मोदी हे जर मोहन भागवतांना भेटत नसतील, तर त्यांनी मोदींचा प्रचार का करावा. कारण, प्रचार करताना भाजपाचा उमेदवार आहे असे सांगितले जात नाही, तर मोदींचा उमेदवार आहे असे सांगितले जाते. त्यामुळे भाजपा संपला असल्याचे ते म्हणाले.

---------------

### अमित शाहांच्या गाडीत

मी अभिमानाने अगदी आत्मविश्वासाने सांगतो की, इंडिया आघाडी ३०० पार करून येणार म्हणजे येणार आहे. इंडिया आघाडीचे सरकार आल्यानंतर महाराष्ट्राच्या हातचे असेल ते आम्ही कोणाला घोरबाडायला देणार नाही म्हणजे नाही. तुम्हाला सुद्धा देणार नाही. संपूर्ण देश तुमचा होता. आता दहा वर्षे खूप झाली, दहा वर्षे संपूर्ण देशाने तुम्हाला संधी दिली तर संधीचं सोनं करायच्या ऐवजी तुम्ही माती करून टाकली आता बस झाले, असे ते म्हणाले. ते पुढे म्हणाले की, पूर्वी असे वाटत होते की मजबूत देश पाहिजे असेल तर सरकार मजबूत पाहिजे आता माझ्या लक्षात आले की जर का देश मजबूत पाहिजे असेल तर सरकार संमिश्र पाहिजे, मिली जुली सरकार पाहिजे आणि एका पक्षाचे आणि एका व्यक्तीचे सरकार हे देशामध्ये हुकूमशाला जन्म देऊ शकतो जो आता दिला आहे. त्याला आत्ताच जर का आपण गाडून टाकले नाही आणि आपल्या सगळ्या इंडिया आघाडीचे संमिश्र सरकार या देशात आणले नाही तर मग आपल्या देशाला कोणी वाली राहणार नाही. ती भारत माता सुद्धा बोलेल अरे काय रे तुम्ही माझे स्वातंत्र्य टिकवू शकला नाहीत. माझ्या देशाचे स्वातंत्र्य टिकवण्यासाठी ही निवडणूक आपल्याला जिंकावीच लागेल, असे आवाहन उद्धव ठाकरे यांनी केले.

--------------

### अवकाळी पावसाचा

आदी जिल्ह्यात अवकाळी पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. १५ एप्रिल २०२४ रोजी उस्मानाबाद, बीड, जालना, औरंगाबाद, अहमदनगर, सोलापूर, पुणे, आदी जिल्ह्यात अवकाळी पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आलेला आहे. तर १६ एप्रिल २०२४ रोजी हिंगोली, नांदेड, लातूर, उस्मानाबाद, सोलापूर आदी जिल्ह्यात अवकाळी पाऊसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

---------------

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शनिवार, दि. १३ एप्रिल २०२४


## 'सेल्फी विथ सिग्नेचर' मतदार जागृती विशेष मोहीम जिल्हाभर राबविण्यात येणार

**बीड । प्रतिनिधी**

राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीपासून 'सेल्फी विथ सिग्नेचर' ही मोहीम विशेष मोहीम जिल्हाभर राबविण्यात येणार असल्याचे ३९ बीड मतदार संघाच्या जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी सांगितले. बीड शहरातील हिरालाल चौक येथे असणाऱ्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला अभिवादन करण्यासाठी जिल्ह्यातील नागरिक येत असतात. सध्या सार्वत्रिक लोकसभेच्या निवडणूका सुरू असून ३९ बीड मतदार संघात सोमवार दिनांक १३ मे रोजी निवडणूक होणार असून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंतीपासून जिल्हाभर 'सेल्फी विथ सिग्नेचर' अशी मोहीम सुरू करण्यात येणार आहे. बीड शहरातील मुख्य पाच ठिकाणी तर प्रत्येक तालुक्याच्या दोन ठिकाणी 'सेल्फी विथ सिग्नेचर' असे सेल्फीचे आणि सिग्नेचर चे फलक असणार आहेत. सेल्फी विथ सिग्नेचर' करून मतदानाला प्रोत्साहन देण्यासाठी मतदारांनी मोबाईल स्टेटस, डीपी ठेवून जागरूकता करावी तसेच  या फेसबुक पेजवर टॅग ही करावे या उपक्रमात अधिकाधिक मतदारांनी सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी केले आले आहे.

# चैतन्य मच्छिंद्रनाथ समाधी दर्शन प्रसंगी भाविक भक्तांच्या झालेल्या गैरसोयीबद्दल देवस्थानच्या वतीने जाहीर दिलगिरी

आष्टी । प्रतिनिधी

वर्ष प्रतिपदेच्या आदल्या रात्री फाल्गुनी अमावस्येच्या रात्री श्री.क्षेत्र चैतन्य मच्छिंद्रनाथ यांच्या संजीवन समाधीचे दर्शन घेण्यासाठी मच्छिंद्रनाथ गडावर आलेल्या भाविक भक्तांची गैरसोय झाली याबद्दल समस्त भाविक भक्तांची मच्छिंद्रनाथ देवस्थान दिलगिरी व्यक्त करत असून पुढील वर्षी मात्र सुसज्ज दर्शन व्यवस्था करून भाविक भक्तांचे चैतन्य मच्छिंद्रनाथ समाधी दर्शन व्यवस्थित होईल अशी चोख व्यवस्था ठेवू अशी ग्वाही मच्छिंद्रनाथ देवस्थान देवस्थानचे विश्वस्त आमदार सुरेश धस यांनी केले. आष्टी येथील निवासस्थानी आयोजित पत्रकार परिषदेमध्ये ते बोलत होते यावेळी बोलताना ते म्हणाले की वर्ष प्रतिपदा गुढीपाडव्याच्या आदल्या रात्री फाल्गुनी अमावस्येच्या निमित्ताने श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ समाधी स्थळ असलेल्या मच्छिंद्रनाथ गड येथे चैतन्य मच्छिंद्रनाथाची समाधी दर्शनासाठी उघडी असते यावेळी मागील वर्षी समाधीला लावलेले उटणे, सुगंधी द्रव्य काढण्यात येऊन.. समाधीला दुग्धाभिषेक करण्यात येतो त्यानंतर पैठण आणि इतर तीर्थक्षेत्रावरूनआणलेल्या पाण्याचे गंगा स्नान करण्यात येते त्यानंतर समाधी स्वच्छ पुसून त्यावर पुढील वर्षासाठी



### पुढील वर्षीचा सोहळा सुसज्ज तयारीनिशी पार पाडू –आ.सुरेश धस यांचे प्रतिपादन

उटणे, सुगंधी द्रव्य लावण्याचे काम सूर्योदयापूर्वी ३० मिनिटांपर्यंत होत असते त्यामुळे रात्रभर भाविक भक्त समाधीच्या जवळ जाऊन मनोभावे दर्शन घेत असतात...

यावर्षीच्या समाधी दर्शन सोहळ्या वेळी अपेक्षा पेक्षा जादा भाविक भक्त उपस्थित झाले त्यामुळे अनपेक्षित जादा संख्येने आलेल्या या भाविक भक्तांच्या दर्शनाच्या रांगेमध्ये स्थानिक स्वयंसेवक, देवस्थान प्रशासन यंत्रणा तसेच पोलीस प्रशासन आणि भाविक भक्त यांच्यामध्ये आम्ही संवाद निर्माण झाला आणि दर्शन रांगेमध्ये एकाच जागी मोठ्या प्रमाणावर भाविक एकत्र झाल्यामुळे त्या ठिकाणी काही अघटीत घटना घडू नये... म्हणून प्रशासनाद्वारे रात्री २ वाजून ३० ते पहाटे ५ .३० या कालावधीमध्ये अत्यंत नाईलाजाने दर्शन व्यवस्था बंद करावी लागली आणि त्यामुळे भाविक भक्तांचे दर्शनामध्ये अडथळा निर्माण झाला... याबद्दल समस्त भाविक भक्तांचे श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ देवस्थान व्यवस्था समिती द्वारे आम्ही दिलगिरी व्यक्त करत आहोत असे सांगून... पुढील वर्षीच्या समाधी दर्शन सोहळ्याच्या वेळी मागील वर्षाचे उटणे काढणे... हा सोहळा दोन दिवस करता येईल का ? याबाबत देवस्थान व्यवस्थापक मंडळ, ग्रामस्थ, सावरगाव ग्रामपंचायत व्यवस्थापन यांची संयुक्त बैठक घेऊन लवकरच निर्णय जाहीर करणार आहोत असे सांगून यावेळी समाधी दर्शन सोहळ्याच्या वेळी  भाविकांनी मोठ्या प्रमाणावर १ हजार रु. च्या बांधकाम निधी देणगी पावत्या घेतल्या आहेत यामध्ये व्यक्तिगत स्वरूपात आणि सामूहिक स्वरूपात देणगी देण्यात आलेली आहे त्याबाबत संस्थांचे अध्यक्ष मोबाईल नंबर ९४ २३ ११ ६२ १४ आणि सचिव मोबाईल नंबर ७७ ९८ ७५ ००७५ या दोघांचे नंबर पावतीवर देण्यात आलेले आहेत ज्या भाविक भक्ताचे समाधी दर्शन होऊ शकले नाही त्यांना१ हजार रु. देणगी परत देण्यात येणार आहे त्यामध्ये.. पुणे, नाशिक आणि नगर येथील भक्तांकडून मोठ्या प्रमाणावर पावत्या घेण्यात आल्या आहेत.. ज्यांना ही रक्कम परत हवी आहे त्यांनी दि.३१ मे पर्यंत किंवा त्यानंतरही वैयक्तिक अथवा सामूहिक पद्धतीने पावत्या जमा कराव्यात..त्यानंतर जमा रक्कम रोख पद्धतीने अथवा आरटीजीएस पद्धतीने त्यांच्या खात्यावर जमा करण्यात येईल अशी माहिती यावेळी आ. सुरेश धस यांनी दिली... पुढील वर्षीच्या चैतन्य मच्छिंद्रनाथ समाधी दर्शनाच्या सोहळ्याच्या वेळी सावरगाव येथील चैतन्य मच्छिंद्रनाथ गड परिसरातील गहूखेल, शेडाळा, गंगादेवी, साकत येथील गंगातीर्थ कावड धारक आणि परिसरातील ५० गावातील नागरिकांची मदत घेऊन हा समाधी दर्शन सोहळा दोन दिवसाचा करता येईल का ? याबाबतचा विचार सुरू होऊन लवकरच याबाबतचा निर्णय जाहीर करू असे सांगत यावर्षी श्रीक्षेत्र चैतन्य मच्छिंद्रनाथ बाबा संजीवन समाधी दर्शन सोहळा साजरा करताना भाविक भक्तांची गैरसोय झाली झाली त्याबद्दल पुन्हा एकदा दिलगिरी व्यक्त करून पुढील वर्षी अधिक सज्जतेने,अधिक सोयी सुविधां उपलब्ध करून देऊन हा सोहळा साजरा करण्यासाठी भाविक भक्तांनी मोठ्या प्रमाणावर उपस्थित राहावे असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

## महात्मा फुले जयंतीच्या निमित्ताने वेशभूषा स्पर्धा

### निशिता– ईशान्वी राऊत प्रथम





**बीड । प्रतिनिधी**

महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त बीड शहरातील महात्मा ज्योतिराव फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्याजवळ लहान मुलांसाठी वेशभूषा स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत मुलांनी उस्फूर्तपणे सहभाग नोंदवला. या स्पर्धेचे परीक्षण अजिनाथ शेरकर व वर्षा राऊत यांनी केले. या स्पर्धेत प्रथम पारितोषिक निशिता नितीन राऊत व ईशान्वी रामेश्वर राऊत यांना विभागून देण्यात आले. तर द्वितीय पारितोषिक श्राव्य राहुल लांडगे व आर्वीका अर्जुन राऊत यांना विभागून देण्यात आले. तृतीय पारितोषिक अनघा महेश काळे व अनन्या महेश काळे या भगिनींना विभागून देण्यात आले. उत्तेजनार्थ पारितोषिक अमृता प्रमोद काळे , ज्ञानेश्वरी चंद्रकांत गजदिवे तसेच रुद्र चंद्रकांत गजदिवे यांना विभागून देण्यात आले. यशस्वी मुलांचे पालकांसह परिसरातील सर्व उपस्थित फुले प्रेमी कार्यकर्त्यांनी अभिनंदन केले. ही स्पर्धा अकरा एप्रिल रोजी सकाळी दहा वाजता घेण्यात आली. या स्पर्धेत मुलांनी आणि पालकांनी उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदवला.

## बीड जिल्ह्यात महात्मा ज्योतिबा फुले जयंती उत्साहात साजरी



**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा प्रशासनाच्यावतीने महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले.

जिल्ह्यात ठिकठिकाणी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून सामान्य नागरिकांनीही महात्मा फुले यांच्या बद्दलचा आदर व्यक्त करत जयंती साजरी केली. बीड शहरात सिद्धिविनायक कॉम्प्लेक्स येथे महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यासाठी मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

## खुशालचंद बेताला यांचे निधन

माजलगाव । प्रतिनिधी

येथील श्री खुशालचंद बालचंद बेताला वय ७५ वर्षे यांचे काल दिनांक १२ एप्रिल २०२४ शुक्रवार रोजी दुपारी ३ वाजता आकस्मिक निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर आज दि.१३ एप्रिल २०२४ शनिवार रोजी सकाळी ९ वाजता माजलगाव येथील राजस्थानी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.



त्यांच्या पश्चात एक मुलगा, सुन, नातवंडे, दोन मुली, जावई असा परिवार आहे. माजलगाव येथील प्रतिष्ठीत व्यापारी आनंद बेताला यांचे ते वडील होते. तर येथील संतोष, राजेंद्र, विजय (बाळु) दुगड यांचे भाऊजी होते.

# लोकसभा निवडणुक प्रथम कर्मचारी प्रशिक्षण यशस्वीपणे संपन्न प्रशिक्षणात मोठ्या संख्येने अधिकारी, कर्मचारी यांची उपस्थिती

**परळी । प्रतिनिधी**

बीड लोकसभा मतदार संघाअंतर्गत परळी विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्र अंतर्गत असलेल्या नियुक्त क्षेत्रीय अधिकारी, समन्वय अधिकारी, मतदान केंद्रावर प्रत्यक्ष काम करणारे केंद्रप्रमुख व सहाय्यक मतदान अधिकारी कर्मचारी यांना मतदान प्रक्रिया, ईव्हीएम व व्हीव्हीपॅट हाताळणीबाबत परळी येथील येथील हालगे गार्डन या ठिकाणी प्रथम प्रशिक्षण यशस्वीपणे संपन्न झाले.यावेळी सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, परळीचे तहसीलदार व्यंकटेश मुंडे, नायब तहसीलदार बाबुराव रुपनर यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथील



अधिकारी व महसूल विभागाचे सर्व कर्मचारी उपस्थित होते.

बीड लोकसभा मतदार संघ ( ३९ ) च्या लोकसभा निवडणुक पार्श्वभूमीवर शुक्रवार दि १२ रोजी सर्वच कर्मचाऱ्यांचे प्रथम प्रशिक्षण संपन्न झाले.अधिकारी व कर्मचारी यांची संख्या लक्षात घेता कोणत्याही प्रकारचा विस्कळीतपणा न येता सुलभ पद्धतीने प्रशिक्षण संपन्न व्हावे यासाठी प्रशिक्षण सकाळ आणि दुपार अशा दोन सत्रात संपन्न झाले.सकाळच्या सत्रात ७८२ तर दुपार सत्रात

७८५ कर्मचारी यांना हे प्रशिक्षण देण्यात आले.

या प्रशिक्षणाची सुरुवात ही राष्ट्रगीताने करण्यात आली तदनंतर मा.जिल्हाधिकारी दीपा मुधोल–मुंडे यांचा या प्रशिक्षणास उद्बोधन करणारा शुभेच्छा संदेश व मार्गदर्शन करणारा शुभेच्छा संदेश दाखवण्यात आला.या प्रसंगी मार्गदर्शन करताना उपविभागीय अधिकारी लाटकर यांनी नियुक्त अधिकारी व कर्मचारी यांची मतदानाच्या आदल्या दिवशी व प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशीचे कर्तव्य व अधिकार याबाबत माहिती दिली. कामकाज करताना होणाऱ्या चुका टाळण्याबाबत निवडणूक आयोगाच्या निर्देशाचे सर्वांनीच पालन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले तर तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांनी नियुक्त कर्मचाऱ्यांनी कर्तव्य पार पाडतात गोपनीयतेचा भंग होणार नाही याची दक्षता घ्यावी. कोणीही प्रशिक्षण व प्रत्यक्ष मतदान यंत्र हाताळणीचे प्रात्यक्षिक टाळू नये. मतदान प्रक्रिया ही निष्पक्ष व खुल्या वातावरणात पार पाडण्यात येऊन मतदान करणाऱ्या मतदाराला केंद्रस्थानी मानून आपले राष्ट्रीय कर्तव्य प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पार पाडावे, असे आवाहन केले.

प्रशिक्षण सत्रांमध्ये प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष मतदान यंत्र, व्हीव्ही पॅड मशीन याचे प्रात्यक्षिक पाहून मतदान यंत्रे स्वतः हाताळनी करून पहिली.या प्रशिक्षणाच्या प्रस्ताविकातून नायब तहसीलदार बाबुराव रुपनर यांनी प्रत्येक कर्मचाऱ्यांनी निकोप आणि आंनददायी वातावरणात राष्ट्रीय कार्यात सहभागी होऊन गोपनीयता भंग होणार नाही याची खबरदारी घेण्याचे सांगितले.

## मेटे साहेबांना त्रास देणाऱ्यांच्या दावणीला रामहरी हे दुर्दैवी –आमटे

**बीड । प्रतिनिधी**

स्वर्गीय दिवंगत लोकनेते विनायकराव मेटे यांनी हाडाची काडं करून उभी केलेली खरी शिवसंग्राम हि संघटना ज्योतीताई मेटे यांच्या पाठीशी खंबीर पणे उभी आहे.

ज्यानी स्वर्गीय दिवंगत लोकनेते विनायकराव मेटे यांच्या शिवसंग्राम संघटनेला मिळणाऱ्या मंत्रीमंडळ विस्तारात मेटे यांना मंत्रीपद मिळू नाही म्हणून आयुष्यभर विरोध केला अशाच्या दावणीला उभ राहणं हे मेटे साहेबांच्या स्वाभिमानी नेतृत्वाला काळीमा फासनार काम रामहरी मेटे यांनी करणे हे अतिशय दुर्दैवी आहे. मेटे साहेबांचे नाव व फोटो



### खरी शिवसंग्राम ज्योतीताई मेटे यांच्या पाठीशी

लावून मेटे साहेबांना उभ्या हयातीत विरोध करणाऱ्यांच्या मांडीला मांडी लावून बसने अतिशय लाजिरवाणी गोष्ट आहे. रामहरी मेटे तुम्हाला मेटे साहेबांनी  काय कामी केलं आज मेटे साहेबांनी हाडाची काड करून उभ केलय. शिवसंग्राम संकटात सापडलेला असताना थोडच्याशा तुकडया साठी फितुरी,दगाबाजी कारण हे मेटे साहेबांच्या भावाला शोभत नाही.ज्यानी मेटे साहेबाना उभ्या आयुष्यात त्रास दिला त्यांना मतदान करा म्हणत फिरताना समाज तुम्हाला तुमची जागा दाखवल्या शिवाय राहणार नाही? मेटे साहेबांचा सच्चा कार्यकर्ता म्हणून जय शिवसंग्राम च्या दुर्दैवी पाठिंब्याचा जाहीर निषेध शिवसंग्राम शेतकरी जिल्हाध्यक्ष राजेंद्र आमटे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

## रमजान ईदनिमित्त राजकिशोर मोदी यांनी ईदगाह मैदानावर जाऊन मुस्लिम बांधवांना दिल्या शुभेच्छा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

हिंदू मुस्लिम ऐक्याचे प्रतीक असलेल्या रमजानच्या पवित्र महिन्यातील (उपवास) रोजे पूर्ण झाल्यानंतर रमजान ईद मोठ्या हर्षोउल्हासात सर्व मुस्लिम बांधवांच्या वतीने साजरी करण्यात आली. ईदच्या दिवशी सकाळी येकदा येलडा रोडवरील इदगाह मैदानावर लहान  थोरांकडून नमाज पठण करण्यात आले. नमाज झाल्यानंतर ईदच्या शुभेच्छा देण्यासाठी राजकिशोर मोदी आपल्या सहकाऱ्यांसह इदगाह मैदानावर जाऊन सर्व मुस्लिम बांधवांना रमजान ईदच्या शुभेच्छा दिल्या. नंतर अनेक बांधवांच्या घरी जाऊन शिरखुर्माचा आस्वाद देखील घेतला.





हिंदू मुस्लिम ऐक्याचे प्रतीक असलेला रमजान ईद हा मुस्लिम बांधवांचा पवित्र सण संबंध देशभरामध्ये मोठ्या उत्साहात साजरा केला जातो त्याचे औचित्य साधून राजकिशोर मोदी यांनी मुस्लिम बांधवांना गळाभेट घेत ईदच्या शुभेच्छा दिल्या. मुस्लिम बांधव आणि राजकिशोर मोदी हे एक समीकरण गेल्या ४० वर्षापासून तयार झाले आहे. दरवर्षी मुस्लिम बांधवांना पवित्र रमजानच्या शुभेच्छा ते देत असतात या महिन्यात अतिशय कडक उन्हाळ्यात मुस्लिम बांधव अल्लाची उपासना करत महिनाभर रोजा (उपवास) करतात. मुस्लिम बांधवांच्या घरी जाऊन त्यांची भेट घेउन शुभेच्छा दिल्या आणि शीरखुर्माचा आस्वाद अंबाजोगाई शहरातील जेष्ठ समाजसेवक हकीम भाई, काझी खय्याम्मोद्दीन, हाजी महमूद, इस्माईल गवळी, गणिसेठ, युसूफ भाई भंगारवाले, अकबर पठाण, मोईन भाई, महेबूब गवळी, सलीम गवळी, जावेद गवळी यांच्यासह अनेकजनांच्या घरी जाऊन घेतला. हा स्नेहभाव गेल्या ४० वर्षापासून त्यांनी जपत ऐक्य भावाची परंपरा जोपासण्याचा प्रयत्न केला. मुस्लिम बांधवाचा रमजान महीना सर्वात पवित्र असा महिना समजल्या जातो. या महिन्याचे धार्मिक त्याचबरोबर वैज्ञानिक दृष्टिने अतिशय महत्व आहे. या महिन्यात संपूर्ण महिनाभर मुस्लिम बांधवांच्या वतीने अतिशय कडक असे उपवास केले जातात. दिवसभर काहीही न खाता किंवा पाणी देखील न पिता उपवास केले जातात.अशा या उपवासाच्या मुळे शरीरातील रोग नाहीसे होण्यास मदत होते. वयाच्या सहाव्या सातव्या वर्षा पासूनची लहान मुले मुली देखील रमजान महिन्यातील रोजा (उपवास) पकडतात. पहिल्यांदा रोजा पकडण्याऱ्या लहान मुलांना त्यांच्या धार्मिक रितिरिवाजा  प्रमाणे नवीन कपडे घेतले जातात संपूर्ण महिना संपल्यानंतर रमजान ईद ही संपूर्ण परिवारासह मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. ईदच्या दिवशी परिवारासह समाजातीतल सर्वांना भेटून ईदच्या शुभेच्छा देण्यात येतात.

## परळीत मुख्य बाजारपेठेत रस्त्यावर वावरणे बनले कठीण

### अतिक्रमण, अवैध वाहन पार्किंगमुळे रस्ते बनले अरुंद,त्यात मोकाट जनावरांचा मुक्त संचार

**परळी । प्रतिनिधी**

परळी शहरातील मुख्य बाजार पेठ असलेल्या मोंढा भागात व्यापाऱ्यांनी केलेले अतिक्रमण, दोन्ही बाजूला दुकाना समोर उभी करण्यात आलेली वाहने आणि त्यातच भर म्हणजे रस्त्यावर वावरणारी मोकाट जनावरांचे कळप यामुळे मोंढा भागात वाहन चालविण्यासोबतच पायी चालणे देखील मुश्किल बनले आहे. प्रशासनाने तात्काळ या प्रश्नावर मार्ग काढावा अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

परळी शहरातील सर्वाधिक वर्दळीचा भाग असलेला स्टेशन रोड ते राणी लक्ष्मीबाई टावर चौक हा रस्ता असून या सुमारे ३० फुटाच्या



रस्त्यावर मोंढा भागात असलेल्या व्यापाऱ्यांनी रस्त्याच्या दोन्ही बाजूला आपल्या दुकानासमोर ३ ते ४ फूट अतिक्रमण केलेले आहे.त्यात भर म्हणजे दुकानासमोर रस्त्याच्या दोन्ही बाजूने वाहने उभी असल्याने मुख्य रस्ता हा वाहतुकीसाठी केवळ १० ते १२ फूट वापरात येत आहेत. एवढ्या रस्त्यावरच दोन्ही बाजूने वाहनांची ये–जा होत असल्याने या रस्त्यावरून वाहन चालविण्यासोबत पायी चालणे देखील कठीण बनले आहे.यातच भर म्हणजे या मार्गावर अनेक वेळा मोकाट जनावरांचा मुक्त संचार असल्याने या मार्गावर वावरने कठीण बनले आहे.

### नगर पालिका आणि पोलीसांनी लक्ष देणे गरजेचे

शहरातील मोंढा बाजारात होत असलेली वाहतुकीची अडचण दूर करण्यासाठी नगर पालिका प्रशासनाने या ठिकाणी असलेले व्यापारी यांना समन्स देऊन मुख्य रस्त्यावर अतिक्रमण करण्यास मज्जाव करावा तर पोलीस प्रशासनाने या ठिकाणी उभी करण्यात येणाऱ्या बेशिस्त वाहनावर कारवाई करावी अशी मागणी आता सर्व सामान्य परळीकर करत आहेत.

## इतिहास विसरणारी माणसं इतिहास घडवू शकत नाहीत -एपीआय सिरसाट

**वडवणी । प्रतिनिधी**

क्रांतीसुर्य महात्मा फुले यांच्या १९७ व्या जयंतीनिमित्त आज वडवणी शहरांमध्ये वडवणी शहराचे पोलीस स्टेशनचे एपीआय मा. अमन शिरसाट साहेब यांच्या शुभहस्ते आज महात्मा फुले चौकामध्ये ध्वजारोहण करण्यात आले त्याचबरोबर या ठिकाणी क्रांतीसुर्य महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी बोलताना अमन शिरसाट साहेब म्हणाले की इतिहास विसारणारी माणसं इतिहास घडू शकत नाहीत. त्यामुळे आपल्याला इतिहास घडवणारे माणसाची आवश्यकता आवश्यकता आहे असे ते म्हणाले. त्यानंतर वडवणी शहरांमधील क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्मारक स्मारकाच्या ठिकाणी जाऊन या ठिकाणी एपीआय शिरसाट साहेब यांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्यांला त्या ठिकाणी पुष्पहार अर्पण करण्यात आले होते यावेळी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोनाजी शिंदे यांनी आपल्या बहारदार सूत्रसंचालन केले यावेळी आलेल्या सर्वांनी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्याला व स्मारकाला अभिवादन केले यावेळी नगरपंचायतचे सभापती बाबासाहेब वाघमारे ,युवा



नेते बाबरी मुंडे ,संजय भाऊ आंधळे नगरसेवक सतीश बडे ,ओबीसी नेते प्रा. वैजनाथ शिंदे ,सरपंच केशराव आंधळे,संपादक अनिल वाघमारे,शामराव शिंदे ,भास्कर उजगरे,युवराज शिंदे,दीपक उजगरे,शिवाजी पवार, पत्रकार अर्जुन मुंडे,संदीप शिंदे सुरेश भोरे बजरंग बप्पा शिंदे, संपादक सतीश जी वाघमारे, भैय्यासाहेब तांगडे ,पत्रकार सतीश मुजमुले,रमेश शिंदे ,विशाल शिंदे ,प्रदीप शिंदे,सावता शिंदे, निरंजन गदळे ,अण्णासाहेब मस्के इथापुरे सर,किरण शिंदे,वडमारे सर ,रमेश मुंडे ,दीपक शिंदे,सावता शिंदे,नारायण शिंदे,ज्ञानेश्वर कटारे,शौर्य शिंदे, नाना शिंदे,विशाखा शिंदे,प्रगती शिंदे,याचबरोबर वडवणी तालुक्यातील सर्व सामाजिक राजकीय शैक्षणिक व चळवळीतील अनेक तरुण कार्यकर्ते या जयंतीला उपस्थित होते .प्रा.तेजस शिंदे,यांच्याकडून आलेल्या सर्व मान्यवरांना चहा पाण्याची सोय केली होती.यावेळीच एक घोषणा करण्यात आली आहे की येणाऱ्या २० एप्रिल २०२४ रोजी वडवणी शहरांमध्ये क्रांतीसुर्य महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त व्याख्याते परमेश्वर बनकर सर यांचे व्याख्यान व  नंतर लगेचच स्वखर्चाने समाजातील लोकांकडूनच फक्त पट्टी घेऊन इतर कोणाची पट्टी न घेता या ठिकाणी स्नेहभोजनाचा कार्यक्रमाचा लाभ सर्व भोजन बांधवांनी घ्यावा असे आवाहन क्रांतिसूर्य महात्मा फुले सार्वजनिक जयंती उत्सवाचे अध्यक्ष बालाजी शिंदे यांनी या ठिकाणी जाहीर केलेले आहे.

# इथेनॉल निर्मितीस लवकरच परवानगी मिळणार ?

## सरकारकडून हालचाली सुरु



पुणे : राज्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देणारी बातमी आहे. डिसेंबर महिन्याच्या मध्यावधीपासून केंद्र सरकारने उसापासून इथेनॉल निर्मिती करण्यास निर्बंध घातले आहेत. मात्र, आता लवकरच इथेनॉल निर्मितीसाठी ८ लाख टन अतिरिक्त साखर वापरण्यास परवानगी दिली जाणार आहे. यंदा अनुमानित अंदाजापेक्षा अधिक साखर उत्पादन मिळण्याची परिस्थिती हंगामाच्या शेवटी तयार झाली आहे. परिणामी, ही अतिरिक्त साखर इथेनॉल निर्मितीकडे वळण्याचा सरकारचा विचार असल्याचे एका रिपोर्टमध्ये म्हटले आहे. ज्यामुळे आता साखर उद्योगाला मोठा दिलासा मिळणार असून, शेतकऱ्यांना बाकी असलेली थकबाकी देण्यास, त्यांना या निर्णयामुळे मदत होणार आहे.

सध्याच्या घडीला राज्यासह देशातील ऊस गाळप अंतिम टप्प्यात आहे. इंडियन शुगर अँड बायो-एनर्जी मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनच्या (इस्मा) आकडेवारीनुसार, देशात सध्या ३१ मार्च २०२४ अखेरपर्यंत एकूण ३०२ लाख टन साखर उत्पादन झाले आहे. अर्थात यावर्षीच्या निर्धारित अनुमानापेक्षा हे साखर उत्पादन अधिक आहे. तर साखर उत्पादन आघाडीवरील राज्य असलेल्या महाराष्ट्रात देखील यावर्षी १०८ लाख टन साखरेचे उत्पादन नोंदवले गेले आहे. जे मागील वर्षीच्या हंगामातील एकूण साखर उत्पादनापेक्षा तीन लाख टन अधिक आहे. अर्थात निर्धारित लक्ष्यापेक्षा अधिकच्या उत्पादनाकडे साखर उत्पादनाची वाटचाल सुरु आहे. दरम्यान, यापूर्वी केंद्र सरकारने आतापर्यंत चालू हंगामात एकूण १७ लाख टन साखर इथेनॉलसाठी वळविण्यास परवानगी दिलेली आहे. त्यामुळे आता आणखी ८ लाख टन अतिरिक्त साखर इथेनॉल निर्मितीसाठी वापरली जाऊ शकते. ज्यामुळे इथेनॉल उद्योगाला मोठा दिलासा मिळणार आहे.

**पुढील पंधरवड्यात निर्णयावर शिक्कामोर्तब ?**

गेल्या काही दिवसांपासून सातत्याने उसापासून इथेनॉल निर्मिती करण्यास परवानगी देण्याची मागणी केली जात आहे. त्यातच आता साखर उत्पादन वाढीची परिस्थिती पाहता, पुढील पंधरवड्यात एकूण साखर उत्पादनाच्या आढावा लक्षात घेतला जाण्याची शक्यता आहे. सध्याच्या आकडेवारीनुसार, प्रत्यक्षात अधिक उत्पादन मिळत असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर या निर्णयावर शिक्कामोर्तब होणार असल्याचे या रिपोर्टमध्ये म्हटले आहे.

# फळबाग शेतकऱ्यांसाठी सरकारची नवीन योजना

## मिळणार तात्काळ अनुदान!

पुणे : राज्यासह देशातील शेतकऱ्यांसाठी सरकारकडून विविध योजना राबविल्या जातात. अशातच आता केंद्र सरकारने देशातील फळबाग उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान उपलब्ध करून देण्यासाठी एक नवीन योजना सुरु केली आहे. ही योजना राष्ट्रीय सामूहिक विकास कार्यक्रमाअंतर्गत (क्लस्टर डेवलपमेंट प्रोग्रॅम) अंतर्गत सुरु करण्यात आली आहे. या योजनेमुळे देशातील शेतकऱ्यांना फळबाग लागवडीसाठी प्रोत्साहन मिळणार आहे. विशेष म्हणजे केंद्र केंद्र सरकारकाच्या फळबाग आणि हॉर्टिकल्चर विभागाकडून याबाबत एक ऑनलाईन प्लॅटफॉर्म सुरु करण्यात आला आहे. ज्यास 'सीडीपी सुरक्षा' असे नाव देण्यात आले आहे.

फळबाग लागवड वाढीस मदत होणार


'सीडीपी सुरक्षा' या केंद्र सरकारच्या ऑनलाईन प्लॅटफॉर्ममुळे देशभरात फळबाग लागवडीकडे शेतकऱ्यांचा कल वळवण्यास मदत होणार आहे. सध्याच्या घडीला देशातील एकूण कृषी उत्पादनात फळबाग उत्पादनाचा वाटा एक तृतीयांश इतका आहे. अलीकडे देशातील फळ पिकांच्या उत्पादनात मोठी वाढ दिसून आली आहे. सरकारच्या आकडेवारीनुसार, २०१०-११ मध्ये फळबाग उत्पादनाची असलेली आकडेवारी २४०० लाख टनांहून वाढून २०२०-२१ मध्ये ३३४० लाख टनांपर्यंत पोहचली आहे.

काय आहे सीडीपी-सुरक्षा ?

सीडीपी-सुरक्षा हा एक डिजिटल प्लॅटफॉर्म असून, त्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या फळबाग पिकांसाठी सहज आणि कमी वेळेत अनुदान मिळवू शकतात. या प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ई-रुपी व्हाउचरद्वारे फळबाग अनुदानाचे पैसे दिले जातात. शेतकऱ्यांना फळबाग अनुदानाचे पैसे त्वरीत प्राप्त होतात. कारण हे पोर्टल एकाच वेळी पीएम किसान, एनआयसी, युआयडीएआय, ई-रुपी, जिओ टॅगिंग आणि जिओ फेन्सिंगशी जोडलेले आहे. सीडीपी-सुरक्षा हा डिजिटल प्लॅटफॉर्म देशातील शेतकरी, दुकानदार, सामूहिक विकास संस्था आणि राष्ट्रीय फलोत्पादन मंडळ यांना एकत्रीतपणे जोडून, शेतकऱ्यांना अनुदान मिळवून देण्यास मदत करते. हे सर्व काम ऑनलाइन व जलदगतीने होत असल्याने शेतकऱ्यांना अनुदान मिळण्यात विलंब किंवा गैरसोय होत नाही. विशेष म्हणजे पडताळणीचे काम देखील वेगाने होते.

कसे मिळणार शेतकऱ्यांना अनुदान ?

शेतकरी मोबाईल क्रमांकाच्या माध्यमातून या पोर्टलवर लॉग इन करू शकतात. या ठिकाणी शेतकऱ्यांना फळबाग अनुदानाशिवाय इतर अनेक सुविधांचा लाभ दिला जातो. एवढेच नाही तर शेतकरी या प्लॅटफॉर्मवर लॉग इन करून बियाणे, रोपवाटिका आणि रोपांची ऑर्डर देऊ शकतात. शेतकऱ्याने ऑर्डर दिल्यानंतर त्यांना पोर्टलवरच बियाणे किंवा रोपांसाठी पैसे द्यावे लागतात. शेतकऱ्यांनी भरलेल्या रकमेनुसार अनुदानाची रक्कम पोर्टलवरच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या खात्यावर वळती केली जाते. यासाठी शेतकऱ्यांना जिओ टॅगिंगद्वारे त्यांच्या शेतातील लागवडीचे फोटो आणि व्हिडिओ अपलोड करावे लागतात. पोर्टलवर फोटो अपलोड होताच अनुदानाचे पैसे एआयद्वारे शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केले जातात. हे पैसे एकाच टप्प्यात शेतकऱ्यांना दिले जातात.



# गव्हाची काढणी करताना नुकसान टाळण्यासाठी घ्या काळजी

सध्या गहू उत्पादक राज्यात गव्हाची काढणी सुरू आहे. एप्रिल महिन्यात शेतकरी गव्हाची काढणी करतात. अनेक ठिकाणी गव्हाची काढणी सुरू झाली आहे, तर काही ठिकाणी काढणीची प्रतीक्षा सुरू आहे. उशिरा काढणी केल्यास या वेळी गव्हाचे अधिक उत्पादन मिळू शकते, असा विश्वास शेतकऱ्यांनी व्यक्त केला. दिल्लीच्या कृषी शास्त्रज्ञांनी गव्हाची लागवड करणाऱ्या शेतकर्यांसाठी गहू कापणीच्या संदर्भात महत्त्वाचा सल्ला दिला आहे.

गहू कापणीच्या संदर्भात पुसा शास्त्रज्ञाने प्रसिद्ध केलेला सल्ला मध्ये त्यांनी असे सांगितले आहे की शेतकर्यांनी सकाळची वेळ गहू काढणीसाठी सर्वात योग्य वेळ आहे. त्यामुळे जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी सकाळी गव्हाची काढणी करावी. गव्हाची कापणी हाताने केली जात असेल तर पिकाचा गुंडाळा ३ ते ४ दिवस शेतातच सोडावा जेणेकरून ते सूर्यप्रकाशात सुकल्यांनंतर त्यातील ओलावा कमी होईल. शेतकऱ्यांनी एप्रिल अखेरपर्यंत सर्व प्रकारच्या गव्हाची कापणी करावी. ज्या शेतकऱ्यांना विळी किंवा कापणी यंत्राच्या सहाय्याने गव्हाचे पीक काढायचे आहे त्यांनी हे लक्षात ठेवावे की कापणी करताना गव्हाचे पीक पृष्ठभागापासून ४ ते ५ सें.मी.



उंचीवर कापावे. पीक कापताना दाण्याचा आवाज येत असेल तर समजून घ्या की पीक काढणीसाठी पूर्णपणे तयार आहे. या पद्धती द्वारे पीक काढणीसाठी तयार आहे की नाही हे शेतकरी सहजपणे ओळखू शकतात.

काढणी दरम्यान धान्यातील ओलावा १५ ते २० टक्क्यांपेक्षा जास्त नसावा. काढणीच्या वेळी बियाण्यातील ओलावा कुठेही जास्त दिसला तर ते शेतात सोडून सुमारे चार ते पाच दिवस वाळू द्यावे. ते पूर्णपणे वाळल्यानंतरच मळणी करावी. पिकांची कापणी उशीरा केल्यास त्याचा पिकाच्या गुणवत्तेवर विपरीत परिणाम होऊ शकतो. याशिवाय पक्षी आणि उंदरांमुळेही पिकाचे नुकसान होऊ शकते त्यामुळे लवकरात लवकर गव्हाची कापणी करावी.

# खतांचा ओव्हरडोस म्हणजे काय? त्याचा प्रभाव कसा ओळखावा

जास्त प्रमाणात खत दिल्याने कीटक वनस्पतींकडे आकर्षित होतात. जेव्हा तुम्ही जमिनीत जास्त खत घालता तेव्हा झाडे पाणी शोषण्यास असमर्थ असतात. अतिरीक्त खतामुळे क्षाराची उच्च सांद्रता निर्माण होऊन माती बदलते आणि यामुळे मातीतील फायदेशीर सूक्ष्मजीवांना हानी पोहोचते. बऱ्याचदा लोक भाज्या किंवा इतर झाडांना जास्त खत घालतात, ज्यामुळे झाडांची पाने पिवळी पडतात. याशिवाय जमिनीची रचना बिघडते आणि झाडाची वाढ खुंटते. जास्त प्रमाणात खत दिल्याने कीटक वनस्पतींकडे आकर्षित होतात. जेव्हा तुम्ही जमिनीत जास्त खत घालता तेव्हा झाडे पाणी शोषण्यास असमर्थ असतात. अतिरीक्त खतामुळे क्षाराची उच्च सांद्रता निर्माण होऊन माती बदलते आणि यामुळे मातीतील फायदेशीर सूक्ष्मजीवांना हानी पोहोचते. रोपाला पुरेसे पाणी आणि पोषक तत्वे पुरवण्यासाठी रूट सिस्टम अपुरी असू शकते. या चिन्हांद्वारे आपण सहजपणे जाणू शकता की वनस्पतीवर खतांचा जास्त प्रमाणात वापर झाला आहे. याबाबत सावधगिरी बाळगली पाहिजे.

जास्त खत देणे हानिकारक :

जास्त खत पर्यावरणासाठी हानिकारक असू शकते. जर तुम्ही खूप पोषक तत्वे जोडली तर जास्तीचे खत आपल्या भूजलात, नद्या आणि महासागरांमध्ये जाते. ज्यांच्याकडे कमी झाडे आहेत त्यांच्यासाठी ही चिंतेची बाब आहे. अनेकजण आपल्या पिकांसाठी मोठ्या प्रमाणात नायट्रोजन वापरत असल्याने शेतकरीही चिंतेत आहेत. त्यापैकी काही प्रमाणात बाष्पीभवन होते आणि काही प्रमाणात पाण्याद्वारे जमिनीत जाते.

तुम्ही झाडांना जास्त खत देत आहात का ?

ज्या झाडांना योग्य प्रमाणात खत मिळते ते जलद वाढतात आणि चांगले दिसतात. तुम्ही तुमच्या झाडांना जास्त खत देत आहात का ते सहज ओळखता येते. झाडाची खालची पाने पिवळी पडणे आणि कोमेजणे. पानांच्या कडा आणि टिपा तपकिरी होणे. काळी, तपकिरी किंवा सडलेली मुळे. मंद वाढ आणि पाने पडणे.

प्रतिबंधात्मक उपाय :

मत्स्यपालन: फिश अँटीबायोटिक म्हणजे काय, ते कसे वापरले जाते, त्याचे फायदे आणि तोटे देखील जाणून घ्या. जेव्हा तुम्ही खताच्या सापळ्यात अडकता किंवा तुमच्या कुंडीत खत साचते तेव्हा तुम्ही तुमची झाडे वाचवण्यासाठी काही पावले उचलू शकता. दीर्घकाळापर्यंत जमिनीतून खताला पाणी द्या आणि खत रूट झोन किंवा भांड्याच्या तळापासून बाहेर टाका. मातीच्या पृष्ठभागावर खताचा थर असल्यास, काळजीपूर्वक काढून टाका. वाळलेली किंवा जळलेली पाने काढून टाका. खत देणे थांबवा आणि तुम्ही वापरत असलेल्या रकमेचा पुनर्विचार करा.




### महत्वाच्या घटना

१६४८ : दिल्ली येथील लाल किल्ल्याची निर्मिती झाली.
१६९९ : गुरु गोबिंद सिंग यांनी खालसा हे गुरु पंथ तयार केले.
१७३१ : इतिहासप्रसिध्द वारणेचा तह होऊन शिवाजी महाराजांनी स्थापिलेल्या स्वराज्याचे दोन भाग झाले
१७३१ : छत्रपती शाहू (सातारा) आणि छत्रपती संभाजी (कोल्हापूर) यांच्यात राज्याच्या सीमेवरुन असलेला वाद वारणेचा तह होऊन मिटला. चैत्र व. २
१७७२ : वॉरन हेस्टींग्ज यांची गव्हर्नर जनरल म्हणून कलकत्ता येथे नेमणूक
१८४९ : हंगेरी प्रजासत्ताक बनले.
१९१९ : जालियानवाला बागची कत्तल भारताच्या अमृतसर शहरातील जालियानवाला बाग येथे भरलेल्या निःशस्त्र नागरिकांच्या सभेवर ब्रिटीश सैन्याने गोळीबार केला. ३७९ ठार. भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामातील ही एक महत्त्वाची घटना होती.
१९३९ : भारतात हिंदुस्तानी लाल सेनेची स्थापना.
१९४२ : व्ही. शांताराम 'प्रभात फिल्म कंपनी'तून बाहेर पडले.
१९४८ : भुवनेश्वर ही ओरिसा राज्याची राजधानी करण्यात आली.
१९६० : अमेरिकाने ट्रान्झिट १-बी हा जगातील पहिला नेव्हिगेशन प्रणालीयुक्त उपग्रह प्रक्षेपित केला.
१९९७ : मास्टर्स टूर्नामेंट जिंकणारे टायगर वुड्स सर्वात तरुण गोल्फर ठरले.
२००० : प्रसिद्ध हिंदी चित्रपट अभिनेत्री लारा दत्ता ह्या विश्वसुंदरी बनल्या.
२०१७ : इचलकरंजी शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी वारणा नदीवर आधारित 'अमृत' योजनेचा प्रारंभ तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते केला गेला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७४३ : थॉमस जेफरसन अमेरिकेचे ३ रे राष्ट्राध्यक्ष, २ रे उपाध्यक्ष आणि १ ले परराष्ट्रमंत्री. त्यांनी मांडलेल्या विचारांवर अमेरिकेची राज्यघटना आधारित असून तेथील लोकशाहीला 'जेफरसनची लोकशाही' असे म्हणतात. (मृत्यू: ४ जुलै १८२६)
१८९० : भारतीय चित्रपट दिग्दर्शक आणि निर्माता तसचं, भारतातील विशिष्ट लांबीचा चित्रपट 'श्री पुंडलिक' चे निर्माता रामचंद्र गोपाळ उर्फ ''दादासाहेब'' तोरणे यांचा जन्मदिन.
१८९५ : वसंत रामजी खानोलकर भारतातील वैद्यकीय संशोधनाचा पाया घालणारे (मृत्यू: २९ आक्टोबर १९७८)
१८९८ : प्रसिद्ध भारतीय चित्रपट निर्माता, दिग्दर्शक व पटकथा लेखक चंदूलाल शाह यांचा जन्मदिन.
१९०५ : ब्रूनो रॉस्सी पृथ्वीच्या चुंबकीय क्षेत्रामुळे होणार्या वैश्विक किरणांच्या विकीरणा विषयी संशोधन करणारे इटालियन-अमेरिकन पदार्थवैज्ञानिक (मृत्यू: २३ नोव्हेंबर १९९३ केम्ब्रिज, मॅसेच्युसेटस, यू. एस. ए.)
१९०६ : सॅम्युअल बेकेट आयरिश लेखक, नाटककार, कवी आणि दिग्दर्शक (मृत्यू: २२ डिसेंबर १९८९)
१९१३ : दत्ताजी ताम्हाणे, स्वातंत्र्यसेनानी आणि समाजवादी विचारवंत. मृत्यू
१९२२ : ज्यूलिअस न्येरेरे टांझानियाचे पहिले राष्ट्राध्यक्ष (मृत्यू: १४ आक्टोबर १९९९)
१९२५ : स्वातंत्र्यपूर्व भारताच्या ब्रिटीश राजवटीमधील सक्रीय स्वातंत्र्यसेनानी व प्रसिद्ध चित्रपट गीतकार वर्मा मलिक यांचा जन्मदिन.
१९४० : नजमा हेपतुल्ला राज्यसभा सदस्य
१९५६ : सतीश कौशिक अभिनेता, निर्माता, दिग्दर्शक
१९६३ : गॅरी कास्पारॉव्ह रशियन बुद्धीबळपटू

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९५१ : भवानराव श्रीनिवासराव तथा 'बाळासाहेब' पंतप्रतिनिधी औंध संस्थानचे अधिपती, चित्रकार, कीर्तनकार तसेच व्यायामविषयक पुस्तकांचे कर्ते (जन्म: २४ आक्टोबर १८६८)
१९७३ : बलराज सहानी अभिनेता व दिग्दर्शक (जन्म: १ मे १९१३)
१९८८ : हिरामण बनकर महाराष्ट्र केसरी
१९९९ : डॉ. हिरोजी बळीरामजी उलेमाले कृषीतज्ञ, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू (जन्म:)
२००० : विश्वास नरहर तथा 'बाळासाहेब' सरपोतदार चित्रपट निर्माते व वितरक, अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष (जन्म:)
२००७ : सुप्रसिद्ध भारतीय कवी, समीक्षक, अनुवादक आणि शास्त्रीय साहित्याचे प्रतिपादक मल्लमपल्ली सरभेश्वर सरमा उर्फ 'सरभ्याय' यांचे निधन.
२००८ : दशरथ पुजारी, मराठी संगीतकार

# सोयाबीन दरात मोठी घसरण; २३०० रुपये क्विंटल मिळतोय भाव!


पुणे : राज्यात सध्या सोयाबीन दराने तळ गाठला आहे. एकीकडे विदर्भ-मराठवाड्यात राजकीय नेत्यांची निवडणूक रणधुमाळी सुरु आहे. तर त्याच वेळी विदर्भ-मराठवाड्यातील बाजार समित्यांमध्ये सोयाबीनचे दर २३०० रुपये प्रति क्विंटलपर्यंत खाली घसरलेले पाहायला मिळत आहेत. ज्यामुळे सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांबाबत सत्ताधाऱ्यांना आणि राजकीय मंडळींना कोणतेही सोयरेसुतक नसल्याचे पाहायला मिळत आहे.

गुरुवारी राज्यातील वरोरा बाजार समितीत सोयाबीनला २३०० रुपये प्रति क्विंटल इतका निच्चांकी दर मिळाला आहे. तर लासलगावजवळील विंचूर बाजारात देखील सोयाबीन दराने ३००० रुपये प्रति क्विंटलपर्यंत घसरण नोंदवली आहे.

विशेष म्हणजे बाजारात एखाद्या मालाची आवक घटलेली असेल. तर त्याच्या किमतीमध्ये सुधारणा होते. मात्र, सोयाबीन बाजारात आवक मोठ्या प्रमाणात घसरलेली आहे. मात्र, दरवाढ होण्याऐवजी दिवसेंदिवस सोयाबीनचे दर उतरणीकडे झुकत असल्याचे पाहायला मिळत आहे. सोयाबीनसाठी यावर्षी केंद्र सरकारने ४६०० रुपये प्रति क्विंटल इतका हमीभाव निर्धारित केला आहे. मात्र, असे असतानाही काही निवडक बाजार समित्या वगळता सध्या सोयाबीनला हमीभावापेक्षा कमी दर मिळत आहे. ज्यामुळे सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांचा पाय दिवसेंदिवस खोलात चालल्याचे पाहायला मिळत आहे.

कुठे झालीय घसरण ?

राज्यात सध्याच्या घडीला जवळपास सर्वच बाजार समित्यांमध्ये सोयाबीनला सरासरी ३७०० ते ४५०० रुपये प्रति क्विंटलपर्यंत दर मिळत आहे. मात्र, चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा-शेगाव बाजार समितीत सध्या कमाल ४००० ते किमान २३०० रुपये तर सरासरी ३८०० रुपये प्रति क्विंटल दर मिळत आहे. नाशिक जिल्ह्यातील लासलगाव विंचूर बाजार समितीत सध्या कमाल ४६१५ ते किमान ३००० रुपये तर सरासरी ४५५० रुपये प्रति क्विंटल, छत्रपती संभाजीनगर बाजार समितीत सध्या कमाल ४४५१ ते किमान ३००० रुपये तर सरासरी ३७२६ रुपये प्रति क्विंटल, धुळे बाजार समितीत सध्या कमाल २६४५ ते किमान २६४५ रुपये तर सरासरी २६४५ रुपये प्रति क्विंटल, हिंगणघाट बाजार समितीत सध्या कमाल ४८५० ते किमान २९०० रुपये तर सरासरी ३९०० रुपये प्रति क्विंटल दर मिळत आहे.



# आष्टी शहरात महात्मा फुले जयंती विविध कार्यक्रमांनी उत्साहात साजरी

आष्टी । प्रतिनिधी


थोर समाजसुधारक, विचारवंत,समाजातील विविध अनिष्ट प्रथा दूर करण्यासाठी ज्यांनी आपलं आयुष्य वेचलं असे क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त म.फुले सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्यावतीने आष्टी शहरात महात्मा फुले जयंती मिरवणुकीत भव्य शोभायात्रा,सरगम बॅन्जो व हलगी पथक कर्नाटकचे पारंपारिक वाद्य,भव्य चेडे पथक, मर्दानी खेळांचे प्रात्यक्षिके,कसरती झाल्या.

क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांनी सामाजिक प्रबोधन, अस्पृश्यता व जातिव्यवस्थेचे निर्मूलन आणि स्त्रियांना आणि मागास जातीच्या लोकांना शिक्षण देण्याचे कार्य केले.आजच्या आधुनिक विचारांच्या साक्षर समाज निर्मितीमध्ये त्यांचे अमुल्य योगदान आहे त्यामुळे त्यांची जयंती यंदा आष्टी तालुक्यात उत्साहात साजरी करण्यात आली. दि.७ एप्रिल रोजी रक्तदान झाले.या शिबीरात मोठ्या प्रमाणावर रक्तदात्यांनी रक्तदान केले.महात्मा फुले जयंतीनिमित्त सकाळी आष्टी शहरातील महात्मा फुले चौकात फुलेंच्या पुतळ्याला अभिवादन करुन भव्य मोटारसायकल रॅली निघाली.सालेवाडी येथे पोहचून तिथे फुले यांना अभिवादन करुन आष्टी शहरात समारोप झाला.आष्टी येथे सत्यशोधक महात्मा ज्योतिबा






फुले यांच्या १९७ व्या.जयंती उत्सवानिमित्त रविवार दि.७ एप्रिल रोजी संत सावतामाळी मंदिरात भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. गुरुवार दि.११ एप्रिल रोजी सोलेवाडी ते आष्टी अशी भव्य महिलांची मोटार सायकल रॅली सकाळी संपन्न झाली.सकाळी १० वा.आ.सुरेश धस,आ. बाळासाहेब आजबे, माजी आ.भीमराव धोंडे , तहसीलदार प्रमोद गायकवाड,विजय गोल्हार,डा.शिवाजी राऊत,अशोक साळवे, युवानेते महेश आजबे, नगराध्यक्ष जिया बेग, उपनगराध्यक्ष शैलेश सहस्त्रबुद्धे,किशोरमामा झरेकर ,नगरसेवक ज्ञानदेव राऊत,सुनिल रेडेकर,यशवंत खंडागळे, बाळासाहेब बोरूडे,जेष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे ,जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे,माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे, विठ्ठलराव बन्सोडे,प्राचार्य डॉ.सोपान निंबोरे,पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रविण पोकळे,गणेश दळवी, संतोष सानप,खंडूदादा जाधव,सुनील रेडेकर ,रत्नदीप निकाळजे, सरपंच अशोक मुळे,किशोर झरेकर आदी सामाजिक,राजकीय, धार्मिक,व्यापार क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्याचे पूजन करण्यात आले. जयंतीनिमित्त भव्य शोभायात्रा गुरुवार दि.११ एप्रिल २०२४ रोजी सायंकाळी ४ ते १० पर्यंत भव्य शोभायात्रा झाली. या शोभायात्रेत सरगम बॅन्जो व हलगी पथक तसेच कर्नाटकचे पारंपारिक वाद्य,भव्य चेडे पथक सायंकाळी ४ ते १० यावेळात प्रात्यक्षिके झाले.संगमनेर येथील सुप्रसिद्ध मर्दानी खेळांचे प्रात्यक्षिकेसुध्दा झाली.



**बीड : क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करताना आ.संदीप क्षीरसागर, महाविकास आघाडीचे बीड लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार बजरंग सोनवणे यांच्यासह समाजबांधव.**



**बीड : स्त्री शिक्षणाचे प्रणेते, थोर समाज सुधारक,महात्मा ज्योतीराव फुले यांच्या जयंती निमित्त भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी महात्मा ज्योतीराव फुले व सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. यावेळी डॉ. सुभाष जोशी, बालाजी पवार, पत्रकार संदीप बेद्रे, मीराताई गांधले, संध्याताई राजपूत, प्रीतीताई कुकडेजा, राजू शहाणे, बद्रीनाथ जटाळ, विशाल पाखरे आदि उपस्थित होते.**



**बीड : क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांना वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते अजय सरवदे, खंडू नाना जाधव, लखन काका जोगदंड, मिलिंद सरपते, सामाजिक कार्यकर्ते नितीन मुजमुले, दीपक कांबळे यांनी अभिवादन केले त्यावेळी टिपलेले छायाचित्र.**



**माजलगाव:- क्रांती सुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंती निमित्त शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.यावेळी मानवी हक्क आभियानाचे जिल्हाध्यक्ष राजेश घोडे, शेकापाचे नेते ॲड. नारायण गोले पाटील,शेलापुरीचे माजी सरपंच भारत जाधव,छेटेवाडीचे माजी सरपंच प्रल्हाद दळवी यांची उपस्थिती होती.**

## सर्पदंशाने मिनाबाई पवार यांचा मृत्यू

अंमळनेर । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील दौलतवाडी येथील शेतकरी महिला मिनाबाई सुखदेव पवार( वय ४०) यांना विषारी सापाने दंश केल्याने उपचारादरम्यान जामखेड येथील एका हाँस्पीटलमध्ये मृत्यू झाल्याची घटना सोमवार दिनांक ८ एप्रील रोजी दुपारी ३.३० वाजता घडली.

याविषयी अधिक माहिती अशी की, अंमळनेर नजीक दौलतवाडी येथील मिनाबाई सुखदेव पवार या नेहमी प्रमाणे सकाळी सात वाजता उठुन स्नान करण्यासाठी गेल्या असता आंघोळ करीत असतानाच पाठिमागुन विषारी सापाने पाठीमध्ये दंश केला. काही काळानंतर त्यांच्या लक्षात येताच त्यांना त्रास जाणवु लागला ,तात्काळ एका वाहनाने जामखेड येथे नेहण्यासाठी जात असताना वाटेतच त्यांना जास्त त्रास जाणवायला लागला . हाँस्पीटलमध्ये उपचार सुरु करण्यात आले परंतु एका दिवसानंतर त्यांनी उपचाराला साथ देणे बंद केल्याने डॉक्टरांनी शर्थीचे प्रयत्न करुनही उपयोग झाला नाही, अखेर त्यांचा मृत्यू झाला

## बीड मतदार संघातील मतदान यंत्रांचे विधानसभानिहाय वाटप प्रक्रिया सुरु

बीड । प्रतिनिधी

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ अनुषंगाने ३९ बीड मतदार संघातील मतदान यंत्रांचे प्रथमस्तरीय संगणकीकृत सरमिसळ (१ ) बुधवारी झाले असून आज मतदान यंत्राचे विधानसभा निहाय वाटप करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली. वखार महामंडळाच्या गोदामा मध्ये जिल्हादंडाधिकारी दीपा मुधोळ मुंडे, अपर जिल्हाधिकारी डॉक्टर त्रिगुण कुलकर्णी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्र कुमार कांबळे, तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी यांच्यासह विविध राजकीय पक्षाचे पदाधिकारी उपस्थितीत ही प्रक्रिया सुरू




आहे. पुढील दोन दिवस विधानसभा निहाय वाटपाची ही प्रक्रिया सुरू असणार आहे

सरमिसळ प्रक्रियेनंतर २८२४ बॅलेट युनिट आणि २८२४ कंट्रोल युनिट आणि ३०५९ व्हीव्हीपॅटचे वाटप विधान सभा मतदारसंघनिहाय वाटप वखार महामंडळाच्या गोदामात करण्यात आले केले आहे. हे मतदान यंत्र विधानसभा निहाय वाटप करणेकरीता गोदाम उघडण्याची परवानगी व ईव्हीएम मशीन्स विधानसभानिहाय स्थलांतर करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे आज २२८-गेवराई, २२९-माजलगांव, २३०- बीड, २३१-आष्टी, २३२-केज, २३३-परळी विधानसभा मतदार विभागासाठी ईव्हीएम व व्हीव्हीपॅट मशिन्सचे प्रथम सळमिसळ (१ ) करण्यात आली आलेली आहे. आता या सरमिसळ (१ ) प्रक्रियेनंतर या ईव्हीएम व व्हीव्हीपॅट मशीन भारतीय निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे आणि विहित कार्य पद्धतीप्रमाणे योग्य त्या सुरक्षित ठिकाणी ठेवण्यात येणार आहेत.

## रमजान महिना व ईद निमित्ताने पाटोदा पोलीस स्टेशन ने ठेवली विशेष सुरक्षा

पाटोदा । प्रतिनिधी

रमजान महिना चालू झाल्यापासून पाटोदा शहरांमध्ये संध्याकाळच्या वेळेस रोजा इफ्तार च्या खरेदीसाठी रस्त्यावर विक्रेत्यांची व लोकांची गर्दी होत असल्याने पाटोदा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री अनमोल केदार यांनी दररोज सायंकाळी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक असे पोलीस गस्त सुरू ठेवली. तसेच प्रत्येक शुक्रवारच्या नामाजाच्या ठिकाणी योग्य पोलीस बंदोबस्त नेमला.

पवित्र रमजान महिन्यांमध्ये रोजा ठेवणाऱ्यांसाठी पोलीस स्टेशन पाटोदा येथे पोलीस स्टेशन तर्फे रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले. सदर पार्टीमध्ये पाटोदा शहरातील हिंदू मुस्लिम ऐक्य दिसून आले . तसेच रमजान ईद व महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती एकाच दिवशी व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती १४ एप्रिल रोजी



साजरी होणार असल्याने पाटोदा शहरातील प्रतिष्ठित नागरिकांची शांतता बैठक घेण्यात आली. आज दिनांक ११ ४ २०२४ रोजी रमजान ईद निमित्त ईदगाह मैदान पाटोदा येथे मुस्लिम बंधूंना ईदच्या नमाज पठनाच्या वेळी पोलिसांचा योग्य बंदोबस्त लावण्यात आला होता तसेच नमाज झाल्यानंतर पाटोदा पोलीस स्टेशन चे सहा पोलीस निरीक्षक श्री अनमोल केदार, पोलीस उपनिरीक्षक श्री गाडे,पोलीस उपनिरीक्षक श्री काटकर, पोलिस अमलदार गडकर यांनी मुस्लिम बांधवांना ईद च्या शुभेच्छा दिल्या.. त्यावेळी माननीय तहसीलदार निलावाड साहेब, तसेच पाटोदा शहरातील प्रतिष्ठित नागरिक हजर होते.

## लव्हूरी येथे रमजान ईद उत्साहात साजरी

येवता । प्रतिनिधी

केज तालुक्यातील लव्हूरी येथे दरवर्षा प्रमाणे याही वर्षी सर्व जाती धर्मातील हिंदू-मुस्लिम लोकांनी एकत्र येऊन ईद सणाच्या एकमेकांना शुभेच्छा देऊन आनंदात सण साजरा करण्यात आला या कार्यक्रमास लहूरी सह आसपासचे सहा ते सात गावातील सर्व जाती धर्मातील लोकांनी एकत्र येऊन शीरखुर्मा, गुलगुल्या इत्यादी पदार्थाचे सेवन करीत जेवणाचा स्वाद घेतला कार्यक्रम सकाळी आठ ते दुपारी चार पर्यंत नियमित चालू होता कार्यक्रमास सय्यद महबूब,शेख नबी,शेख सय्यद,अफसर शेख, वाजेद शेख,उस्मान शेख,आयनोदिन,रफिक सय्यद, शेख नसीर बाबा,संजय चाळक गजेंद्र जाधव,गणपत चाळक इत्यादी ग्रामस्थ



सहपरीसरातील लोक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## परळी उपजिल्हा रुग्णालयात दिव्यांगांचे प्रमाणपत्र तपासणी केंद्र सुरू

परळी / प्रतिनिधी

परळी येथील उपजिल्हा रुग्णालयामध्ये दुसऱ्या व चौथ्या शुक्रवारी दिव्यांगांचे ऑनलाईन प्रमाणपत्र तपासणी केंद्र सुरू होणार आहे, दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ ची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरिता दिव्यांगत्वाचे एकूण २१ प्रकार निश्चित करण्यात आलेले असून दिव्यांग व्यक्तींना दिव्यांगत्वाचे मूल्यमापन व दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र वितरणासाठी मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत त्यानुसारच उपजिल्हा रुग्णालय परळी येथे दिव्यांग व्यक्तींसाठी दिव्यांग समितीची स्थापना करण्यात आलेली आहे.

यामध्ये डॉ अशोक.आर.बडे (जिल्हा शल्यचिकित्सक) जिल्हा रुग्णालय बीड अध्यक्ष, डॉ जी.व्ही सुरमवाड वैद्यकीय अधीक्षक उपजिल्हा रुग्णालय परळी वै (सचिव) व पुढील प्रमाणे सदस्य असतील यामध्ये डॉ.मोमीन मुजाहिद वैद्यकीय अधिकारी वर्ग-१ मानसोपचार तज्ञ, डॉ संतोष कदम वैद्यकीय अधिकारी वर्ग-२ अस्थिरोग तज्ञ, डॉ बी.पी.वर्ग-२ कान,नाक,घसा तज्ञ, डॉ वि.यु.पवार वर्ग-२ कान,नाक,घसा तज्ञ, डॉ प्रदीप सानप वैद्यकीय अधिकारी वर्ग-२ नेत्ररोग तज्ञ, डॉ निळे सचिन वैद्यकीय अधिकारी वर्ग-२ बालरोगतज्ञ, डॉ धम्मपाल शिंदे वैद्यकीय अधिकारी वर्ग-२ भिषकतज्ञ, वरील प्रमाणे तज्ञ डॉक्टरांची टीम दिव्यांग व्यक्तींचे दिव्यांगत्वाचे मूल्यमापन करून दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र आपल्या स्तरावर संबंधितास महिन्यातील दुसऱ्या व चौथ्या शुक्रवारी सकाळी ९ ते दुपारी २ पर्यंत वितरित करतील, या तपासणी केंद्रासाठी दिव्यांग कल्याण मंत्रालय महाराष्ट्र उपाध्यक्ष डॉ संतोष मुंडे यांनी जानेवारीमध्ये पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्याकडे या तपासणी केंद्रासाठी मागणी केली होती आणि त्यानुसारच डॉ संतोष मुंडे यांच्या मागणीला यश आले आहे,यापूर्वी दिव्यांगांना ऑनलाइन प्रमाणपत्र तपासणीसाठी आंबेजोगाई किंवा बीड येथील केंद्रामध्ये जावे लागत होते आता हीच सुविधा परळी येथील उपजिल्हा रुग्णालयामध्ये सुरू झाल्यामुळे दिव्यांगांची होणारी परेशानी दूर होणार आहे, यामुळे अधिकाधिक दिव्यांग या ऑनलाइन तपासणी केंद्राचा लाभ घेतील. दर महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शुक्रवारी परळी उपजिल्हा रुग्णालयामध्ये सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत सदरील तपासणी सुरू असणार आहे.

## श्रुती शांतलिंग फुटकेला आयआयटी रोपर पंजाब येथून पीएचडी प्रदान

परळी । प्रतिनिधी

शहरातील शास्त्रीनगर भागातील रहिवासी श्रुती शांतलिंग फुटके-पाटील हिला आयआयटी रोपर पंजाब येथून नुकतीच पीएचडी प्रदान करण्यात आली. याबद्दल तीचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. येथील शास्त्रीनगर भागातील रहिवासी, वैद्यनाथ बँकेतील पिग्मी एजंट शांतलिंग फुटके यांना एक मुलगा एक मुलगी असून आर्थिक परिस्थिती तशी बेताचीच आहे. आर्थिक परिस्थिती बेताची असताना शिक्षणाचे महत्त्व जाणत दोन्ही मुलांना काटकसर करत शिक्षणासाठी आवश्यक खर्च केला.मुलांनीही आपल्या वडीलांचे कष्ट, मेहनत पाहून जबाबदारीने शिक्षण पूर्ण केले. मुलगा शुभमने इंजिनिअरिंग पूर्ण केले.

सध्या मुंबई येथे खाजगी कंपनीत नौकरी करत आहे तर मुलगी श्रुती हिने नुकतीच पीएचडी प्राप्त केली आहे. श्रुती चे शालेय शिक्षण न्यु हायस्कूल




येथे, पाँलिटेकनीक शासकीय तंत्रनिकेतन लातूर येथे, बीई टि.बी.गिरवलकर आंबेजोगाई तर एमटेक गुरुगोविंदसिंह इंजिनिअरिंग काँलेज नांदेड ला पूर्ण केले. याच ठिकाणी काही दिवस तात्पुरती नौकरी केली. कारण याचवेळी भावाचे शिक्षण सुरू असल्याने वडील दोघांच्या शिक्षणाचा भार उचलू शकत नसल्याने हा निर्णय घेतला. याचवेळी परिक्षा दिल्या व पीएचडीसाठी आयआयटी रोपर पंजाब येथे नंबर लागला. याठिकाणी इमेज प्रोसेसिंग आणि कॉम्प्युटर व्हिजन या विषयात डॉ सुब्रमण्यम मुरला यांच्या मार्गदर्शनाखाली अतिशय मेहनतीने व कष्टाने पीएचडी पुर्ण केली.

## अंबाजोगाईत ईद-उल-फित्र ची नमाज उत्साहात साजरी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

मागील एक महिन्यापासून सुरू असलेल्या रमजानच्या रोजाची आज ईद-उल-फित्र च्या नंतर मुस्लिम समाजाच्या रोजाची सांगता अशी आख्यानंकिका आहे आज अंबाजोगाईत सर्व मुस्लिम समाज बांधवांनी ईदगाह मैदान वर जाऊन ईद - उल -फित्र ची नमाज आदा केली नंतर आल्ला कडे दुवा केली या दुवात प्रमुख्याने हिंदू मुस्लिम भाई चारा आखंडीत राहावा या करिता देशात सर्वच ठिकाणी नमाज आदा केली. अंबाजोगाई शहरात आज चार ठिकाणी म्हणजे मांडवा पठाण ईदगाह मैदान,९:०० वा चांद मारी मैदान ९:००, किरमानी बाबा दर्गा ईदगाह, ९:३० मरकज मज्जिद १०:०० या ठिकाणी हजारो,मुस्लिम बांधवाना शुभेच्या देण्या करिता राजकीय व्यवसाय मंडळी चढा ओढीने हजर होते.

नमाज झाल्या नंतर सर्व राजकीय मंडळी मित्रमंडळींना मुस्लिम बांधवांनी



शीरखुर्माची आमंत्रण दिले आज संपूर्ण शहरात असे सामाजिक बांधिलकीचे दर्शन दिसून आले जो तो आपल्या मुस्लिम मित्राला भेटण्यासाठी त्यांच्या घरी जाऊनश ीरखुर्मा व गुलगुल्याचा आस्वाद घेऊन गळा भेट घेऊन शुभेच्छा देत होता. मुस्लिम समाजाचा रमजान महिना हा तीस दिवस रोजे धरून पाच वेळेस ची नमाज अदा करून गोरगरिबा मध्ये अन्नधान्याचे किंवा पैशाच्या स्वरूपातले दान करून जेवढे पुण्य कमावता येईल तेवढे पुण्य गमाण्याचे काम हा मुस्लिम समाज पूर्ण इबादितीने करत असताना मागील महिन्यात दिसत होते या महिन्याची विशेषता इतर महिन्याच्या बाबतीत वेगळी आहे असेही म्हणणे होते. पवित्र ग्रंथ कुरांन च्या मनन्यानुसार मुस्लिम समाजाने या महिन्यात जेवढे काही पुण्य केले ते ७० पटीने मोजले जाईल या मुळे मुस्लिम समाजातील लहाणं, थोर, स्त्री पुरुष प्रमुख पाचतत्त्वातील तीन चार तत्त्वांचे काटेकोरपणे पालन करण्याचा प्रयत्न करतना या रमजान च्या महिन्या दिसून येतात असतात. मुस्लिम बांधवांचा रमजान महिना व्यवस्थित जावा या करिता हिंदू भाई सुद्धा वारंवार मदत करताना. दिसतात असाच भाईचारा सामाजिक सलोखा संपूर्ण देशात राहावा हीच ईश्वर अल्लाकडे हात जोडून मागणी.

## सहाय्यक पोलीस अधीक्षक डॉ. बी.धीरज कुमार यांच्या हस्ते शैक्षणिक साहित्य वाटप

माजलगाव । प्रतिनिधी

सामाजिक बांधिलकी जपत द लास्ट ट्रूथ फाउंडेशन ने ऊसतोड मजुरांची जिल्हा परिषद शाळेत शिकणाऱ्या ३०० मुलांना शैक्षणिक साहित्य गेली तीन वर्षे वाटप केले आहे. त्याच प्रमाणे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, ब्राम्हगाव येथील मुख्याध्यापक गवळी सर यांच्या विनंती वरून विद्यार्थ्यांना कर्तव्य दक्ष सहाय्यक पोलीस अधीक्षक डॉ.बी.धीरज कुमार यांच्या हस्ते सर्व मुलांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. या प्रसंगी सर्व विद्यार्थ्यां सोबत साह्यक पोलिस अधीक्षक तथा उपविभागीय पोलिस अधिकारी यांनी गप्पा मारत वेळ घालवला व मला माझ्या शालेय




जीवनाची आठवण आली असे ते म्हणाले. द लास्ट ट्रूथ फाउंडेशन च्या कार्याचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या.

द लास्ट ट्रूथ फाउंडेशन चे फाउंडर ऋषिकेश संजीवनी अशोकराव टाकणखार यांनी पुढील वर्षात संस्थेच्या वतीने सामान्य मानसिक आरोग्य, मासिक पाळी जनजागृती, काही जिल्हापरिषद शाळेत वाचनालय, टॉय लॅब्ररी, एल ई डी टिव्हीचे वाटप, फिरते वाचनालय हे उपक्रम राबवणार आहेत असे सांगितले. या प्रसंगी शा.व्य.समिती अध्यक्ष अशोक कांबळे, दत्ता कांबळे, उपसरपंच अनिल कांबळे, उपस्थित होते, संस्थेच्या वतीने चेतन निसर्गंध, मानव पोटभरे, अजय तरकसे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन गवळी यांनी केले तर आभार सानप यांनी मानले.



# तुमचं प्रत्येक मत माझ्यावर कर्ज; जिल्हा विकसित करूनच परतफेड करू - पंकजाताई मुंडे

## पाटोद्याच्या बैठकीत महायुतीच्या नेत्यांसह कार्यकर्त्यांनी कसली पंकजाताईंच्या विजयासाठी कंबर

## पंकजाताईंच्या दारात कुठलाही रंग पाहिला जात नाही; इथे प्रत्येकाचे काम सन्मानपूर्वक केले जाते

**पाटोदा । प्रतिनिधी**

पंकजाताईंच्या दारात कुठलाही रंग पाहिला जात नाही. प्रत्येकाचं काम इथं सन्मानपूर्वक केलं जातं. समाजातील सर्व घटकांचे हित साधत वंचित, उपेक्षितांचे स्वप्न साकार करण्यासाठीच आम्ही राजकारणात आहोत. लोकनेते मुंडे साहेबांची लेक म्हणून माझ्यावर जरूर प्रेम करा, पण मला मतदान करतांना माझ्यातील नेतृत्व, कर्तृत्वाला मतदान करा. तुमचं प्रत्येक मत हे माझ्यावर कर्ज आहे, त्याची परतफेड जिल्हयात विकासाची कामे करूनच करेन त्यासाठी मला साथ द्या असं आवाहन भाजपा महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांनी आज येथे केलं. गेल्या निवडणुकीत पाच लाख मतं घेणाऱ्यांनी पाच वर्षांत जनतेचा चेहरा तरी पाहिला आहे का? असा सवालही त्यांनी केला.

भाजपा महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ शहरात आज कार्यकर्त्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी त्या बोलत होत्या. व्यासपीठावर पालकमंत्री धनंजय मुंडे, आ.बाळासाहेब आजबे, माजी आ.भीमराव धोंडे, रामकृष्ण बांगर, दशरथ वनवे, शिवाजी राऊत, विश्वास नागरगोजे, आप्पासाहेब राख, राहूल चौरे, आप्पासाहेब जाधव, देविदास शेंडगे उपस्थित होते. इथली जनता फार दुरदर्शी आहे. जिल्ह्यात बसून त्यांना मुंबई, दिल्ली दिसत असते. इथल्या जनतेने कायम आपल्या नेतृत्वाला जपलेले आहे. मुंडे साहेब निवडणूकीत पडणार अशी चर्चा केली जायची मात्र जनतेने मुंडे साहेबांना निवडून दिले. त्यानंतर डॉ.प्रितमताई मुंडेंनाही मोठ्या मताधिक्याने निवडून देत दिल्लीत पाठवले. आता मी प्रितमताईंची मोठी बहिण आहे, त्यामुळे तुम्ही प्रितमताईंपेक्षा अधिकचे मताधिक्य देवून मला दिल्लीत पाठवा. बीड जिल्ह्याच्या विकासाचा अनुशेष भरून काढत सर्वांना अभिमान वाटेल असे काम मी करून दाखवेल असा विश्वास पंकजाताई मुंडे यांनी व्यक्त केला.पुढे बोलतांना त्या म्हणाल्या, माझे बंधु तथा जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी अतिशय अभ्यासूपणे मार्गदर्शन केले आहे. त्यामुळे आता मी उमेदवार म्हणून माझी



उमेदवारी कशासाठी आहे, कशी आहे याविषयी मी संवाद साधेल खासदार म्हणून मी काय करु शकते हे लक्षात घेण्यासाठी तुम्ही २०१४ ते २०१९ या कालावधीत मी जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून केलेले काम समोर ठेवा.जिल्ह्याच्या विकासासाठी अनेक योजना राबवल्या. महायुतीची उमेदवार म्हणून मी आपल्या सर्वांसमोर आले आहे. आपण सर्वांनी माझ्या निवडणूकीमध्ये मला सहकार्य करत भरघोस मतदान करुन प्रचंड मताधिक्क्याने मला निवडून देत संसदेत पाठवा.

### मी केलेली कामे मतदारांना सांगा

आता नव्या राजकीय वातावरणात आपण लोकसभा निवडणूकीला सामोरे जात आहोत. राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना आणि भाजप अशी आपली युती झाली आहे. त्यामुळे आता आपली ताकद आणखी वाढली आहे. त्यामुळे आता या लोकसभा निवडणूकीत सर्वांनी एकदिलाने कामाला लागावे. गावातील सेवा सोसासटीचे चेअरमन, सरपंच,, पंचायत समिती सदस्य, भाजपाचे शक्ती केंद्र प्रमुख, बुथ प्रमुख, पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच मित्र पक्षाच्या सर्व पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी मला अधिकाधिक मतदान देण्यासाठी मेहनत घ्यावी. पाटोदा तालुक्याच्या विकासासाठी मी पालकमंत्री असताना मोठा निधी दिला. माझा प्रचार करायला जाताना पंकजाताईने पालकमंत्री असताना राबवलेल्या विकासाच्या योजना लोकांना सांगा असे आवाहनही पंकजाताईंनी केले.

तुमच्या उमेदवारावर काही आक्षेप आहेत का? उमेदवाराने कधी कुणाला त्रास दिलाय का? जातीयवाद केलाय का? कुणावर काही दडपशाही केली आहे का? असे सवाल उपस्थितांना करत पंकजाताई म्हणाल्या,सध्याचे वातावरण चांगले नाही. लोकांमध्ये दरी निर्माण करण्याचे काम सुरु आहे. मात्र ही दरी दूर करण्याचे काम मी करणार आहे. विकास हेच भाजप-महायुतीचे ध्येय आहे. मी फार मोठ्या गोष्टी बोलणार नाही मात्र जिल्ह्यातील प्रत्येकाला अभिमान वाटेल असे विकासात्मक काम जिल्ह्यासाठी माझ्या खासदारकीच्या माध्यमातून करेल.

### रेल्वे परळीपर्यंत धावणार

दहा वर्ष प्रितमताई मुंडे बीड जिल्ह्याच्या खासदार राहिल्या. ज्या गोष्टी कधीच कोणी केल्या नव्हत्या, त्या खा.प्रितमताई मुंडेंच्या कार्यकाळात पुर्णत्वास गेल्या. नगर-बीड-परळी रेल्वे नगर ते अंमळनेर पर्यंत रेल्वे धावली आहे. ७५ वर्ष रेल्वेचे स्वप्न पाहिले. आता ती प्रत्यक्षात धावत आहे, थोडे दोन चार वर्ष इकडे तिकडे झाले की, काहीजण रेल्वे कुठे आली बीडला असे म्हणत आहेत, असे सांगत पंकजा मुंडे म्हणाल्या, अमळनेर ते बीड आणि बीड ते परळी रेल्वे ही माझ्या खासदारकीच्या काळात नक्कीच धावेल हा शब्द मी आज तुम्हाला देते. मुंडे साहेबांच्या कार्यकाळात रेल्वेला सर्वाधिक निधी पहिल्यांदा मिळाला असेही त्या म्हणाल्या.

### विरोधक कधी तुमच्याकडे आले का?

पाच लाख मते ज्या उमेदवाराने गेल्या निवडणूकीत बीड लोकसभेत मिळवली. त्या उमेदवाराने बीड जिल्ह्यातील जनतेचा चेहरातरी नंतर पाच वर्षात पाहिला का? असा सवाल करत पंकजाताई म्हणाल्या, असे विरोधक आहेत हेच बीड जिल्ह्याचे खरे तर दुर्दैव आहे.

### विकासकामे करुन तुमच्या मताची परतफेड करणार

तुम्ही मला डोळे झाकून मत द्या, जनतेचे एक मत म्हणजे मी कर्ज समजते. त्या कर्जाची परतफेड मी विकासकामे करुन फेडत असते. माझ्याकडे कोणतीही जात-पात-धर्म असा भेदभाव नसतो. मी कधीही राजकारणाचा गैरवापर केला नाही, मी कधीही वाईट वागलेले नाही. मी कोणाचाही राग मानलेला नाही. केवळ विकासासाठी समाजकारण हेच माझे ध्येय असल्याचेही पंकजाताईंनी स्पष्ट केले.

# मुंडे बहीण - भाऊ राजकीय मदतीसाठी अनेकांना आमदारकीचे स्वप्न दाखवीत आहेत - बजरंग सोनवणे

**बीड । प्रतिनिधी**

मुंडे कुटुंब जातीवादाचा आधार घेऊन मते मागण्याचा केविलवाणा प्रयत्न करत आहेत मात्र त्यांच्या या प्रयत्नाला यश येणार नसल्याचे त्यांच्या लक्षात आल्यामुळे बहीण - भाऊ हे आता नव्या फार्म्युल्या नुसार निवडणुकीत मदत मिळावी म्हणून अनेकांना आमदार करण्याचे स्वप्न दाखवीत फिरत असल्याची प्रखर अशी टीका महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी केली आहे.



बीड लोकसभा निवडणुकीचे दिवस जसे जवळ येऊ लागले, तसे प्रतिस्पर्धी उमेदवार एकमेकांवर टीका - टिप्पणी, आरोप - प्रत्यारोप करू लागले आहेत. महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी भाजपच्या प्रतिस्पर्धी उमेदवार व त्यांचे कुटुंब हे सत्तेत असताना जिल्ह्याचा विकास करू शकले नसून विद्यमान खासदारांना १० वर्षाच्या कार्यकाळात त्यांचा विकास फंड खर्च करता आला नाही. त्यामुळे त्यांचा फंड परत जाण्याची नामुष्की ओढवली. तर मते मिळविण्यासाठी विद्यमान आमदार सोडून त्या अनेकांना विधानसभेला आमदार करण्याचे स्वप्न दाखवीत आहेत. मात्र जिल्ह्यातील विधानसभेच्या जागा किती, त्याहून अधिक जणांना आमदार करण्याचे खोटे आश्वासन देत आहेत. हे मुंडे बहीण - भाऊ किती जणांना आमदारकीचे स्वप्न दाखवणार ? असा सवाल ही उपस्थित केला आहे.

# कोण असली कोण नकली जनताच निकाल लावेल
## अमित शहा यांच्या वक्तव्याला जयंत पाटलांचे प्रत्युत्तर

**नागपूर । प्रतिनिधी**

राज्यात दोन पक्ष फोडूनही भाजपचे समाधान झालेले दिसत नाही. त्यांना पुन्हा सत्तेत येण्याचा भरवसा नाही. यामुळेच ते असे बोलतात. कोण असली कोण नकली याचा फैसला आता महाराष्ट्रातील जनताच लावेल; असे प्रत्युत्तर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी माध्यमांशी बोलताना दिले. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी नांदेड येथील जाहीर सभेत राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेनेवर असली नकली असा हल्ला चढविला होता.

बारामती मतदारसंघात सुप्रिया सुळे यांचे निवडणुकीतील कधीकाळी अजित दादा पवार यांनी त्यांच्या प्रचारासाठी केलेली भाषणे आठवावीत. केलेल्या विकास कामाच्या भरवशावरच त्या निवडून येतात. त्यामुळे यावेळी देखील त्या निवडून येतील असे सांगितले. सुजय विखे पाटील यांनी डॉ.अमोल कोल्हे यांच्या संदर्भात केलेल्या टीकेला उत्तर देताना बैलगाडी शर्यत पुन्हा सुरू करण्यात अमोल कोल्हे यांची चांगली कामगिरी आहे.



ती सुरू झाल्यानंतर आपण घोडीवर बसणार असे सांगितले होते. सुजय विखे पाटील यांना कदाचित ग्रामीण भागात या शर्यतीचे किती वेड आहे, किती मोठ्या प्रमाणात तरुण वर्ग यात गुंतलेला आहे. याची कल्पना नसावी म्हणून ते तसे बोलले असावेत असेही सांगितले. दरम्यान, धैर्यशील मोहिते यांनी भाजपचा दिलेला राजीनामा आणि राष्ट्रवादी काँग्रेसकडून ते लढणार असल्या संदर्भात मला फारसे माहित नाही; असे सांगत त्यांनी हशा पिकविला. इंडिया आघाडीला देशभरात चांगला प्रतिसाद असून, सर्वसामान्यांच्या प्रश्नाकडे इंडिया आघाडीने आपल्या जाहीरनाम्यातून लक्ष दिले असल्याने चांगले कामगिरी करेल. भाजप ४५ पारचा राज्यात दावा करत असताना तीन जागा त्यांनी कोणत्या सोडल्या हे तरी सांगावे जेणेकरून आम्ही समाधान मानून घेऊ असा टोलाही जयंत पाटील यांनी लगावला.

शिंदे गटात गेलेले ज्येष्ठ नेते गजानन कीर्तिकर यांनी ईडीचा वापर करणे ही भाजपची संस्कृती नसल्याचे विधान केले, यावरून जे बोलले ते शिंदे सेनेवर कशा प्रकारचा दबाव होता हे सांगणारे आहे. आता जनतेनेच यातून बोध घ्यावा व त्याचा निकाल लावावा असे आवाहन पाटील यांनी केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रामटेक येथील सभेत आपल्याला शिव्या देणाऱ्यांच्या रांगेत आता शरद पवार देखील सहभागी झाले आहेत असे विधान केले. या संदर्भात बोलताना जयंत पाटील यांनी शरद पवार यांनी राजकीय आयुष्यात कुणालाही शिव्या दिलेल्या नाहीत, राजकीयदृष्ट्या विरोधकांवर धोरणात्मक टीका करणे गैर नाही असा पलटवार केला. यावेळी शहराध्यक्ष दुनेश्वर पेठे,माजी आमदार प्रकाश गजभिये, प्रवक्ते प्रवीण कुंटे पाटील दिलीप पनकुले आदि उपस्थित होते.

# राहुल गांधी यांची संपत्ती २० कोटी रूपयांपेक्षा जास्त

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

वायनाडचे काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी यांनी आगामी सार्वत्रिक निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज सादर करताना आपली संपत्ती जाहीर केली. वायनाडमधून दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रानुसार, राहुल गांधी यांची एकूण संपत्ती २० कोटी रुपयांपेक्षा जास्त असल्याची माहिती बिझनेस स्टॅण्डर्डने आपल्या संकेतस्थळावर दिली.

यापैकी राहुल गांधींकडे ९.२४ कोटी रुपयांची जंगम मालमत्ता आहे आणि स्थावर मालमत्ता सुमारे ११.१४ कोटी रुपयांची आहे. गांधी यांनी त्यांच्या निवडणूक प्रतिज्ञापत्रात ४९.७९ लाख रुपयांचे दायित्वही जाहीर केले.१५ मार्च २०२४ पर्यंत राहुल गांधी यांची शेअर बाजारात ४.३३ कोटी रुपयांची गुंतवणूक आहे. गांधी वंशजांनी अल्काइल अमाइन्स



### उमेदवारी अर्जाच्या प्रतिज्ञा पत्रातून माहिती उघड

केमिकल्स, एशियन पेंट्स, बजाज फायनान्स, दीपक नाइट्राइट, डिवीज लॅबोरेटरीज, डॉ लाल पॅथलॅब्स, फाइन ऑरगॅनिक इंडस्ट्रीजमध्ये शेअर्स खरेदी केले आहेत. गरवारे टेक्निकल फायबर्स, हिंदुस्तान युनिलिव्हर, विनाइल केमिकल्स (भारत), आणि ब्रिटानिया इंडस्ट्रीज ५.५ लाखाची गुंतवणूक आहे. याशिवाय, त्यांच्याकडे काँग्रेस समर्थित नॅशनल हेराल्ड वृत्तपत्राची मूळ कंपनी यंग इंडियनचे १,९०० इक्विटी शेअर्स आहेत, ज्याची किंमत १.९० लाख रुपये आहे. गांधी यांनी म्युच्युअल फंडात ३.८१ कोटी रुपयांची गुंतवणूक केली. राहुल गांधी यांनी १५.२१ लाख रुपयांचे सुवर्ण रोखे २२० युनिट्स खरेदी केले. त्यांनी राष्ट्रीय बचत योजना, पोस्टल बचत योजना, विमा पॉलिसी आणि पोस्ट ऑफिस किंवा विमा कंपनीमधील कोणत्याही आर्थिक साधनांमधील गुंतवणूक आणि रक्कम यासारख्या योजनांमध्ये ६१.५२ लाख रुपयांची गुंतवणूक घोषित केली. तसेच राहुल गांधी यांच्याकडे ३३३.३०० ग्रॅम सोने आणि ४.२० लाख रुपये किमतीचे इतर दागिने आहेत. गांधींनी बहीण प्रियंका गांधी वड्रा यांच्यासमवेत शेतजमिनीची मालकी घोषित केली असून त्याची किंमत २.१० कोटी रुपये आहे.

# पंकजा मुंडे,बजरंग सोनवणे यांच्या विरोधात उतरला माजी सैनिक अंकुश खोटे जिल्ह्याचा भूमिपुत्र

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील आजी माजी सैनिकांचा आज बीडमध्ये आढावा बैठक मेळावा घेण्यात आला. या बैठकीला बीड जिल्ह्यातून किसान संघटनेचे पदाधिकारी कार्यकर्त्यांसह माजी सैनिकांची मोठी उपस्थिती होती. बीड जिल्ह्यात माजी सैनिक, व शहीद झालेल्या जवानांच्या कुटुंबीयांची संख्या वीस हजारापेक्षा जास्त आहे. व भारतीय किसान पार्टीचे सर्व पदाधिकारी शेतकरी वर्ग मोठ्या प्रमाणावर बीड जिल्ह्यात आहे. त्यांच्या सर्वांच्या विनंतीवरून निवडणुकीचा अजेंडा. विकासात्मक मुद्दे, बीड लोकसभा का लढवायची आहे?आपण निवडणूक लढवायची आणि जिंकवायची अशा साऱ्या गोष्टीवर विचार मंथन बैठक घेण्यात आली. या बैठकीला जिल्हाभरातून माजी सैनिकांनी उपस्थिती लावली होती. अनेकानी मनोगतही व्यक्त केले. या होणाऱ्या निवडणुकीत आपलं मतदान आपल्याच माणसाला असा निर्धार चं विजयाचा केला. आपल्या समोरचे कितीही मोठे कारखानदार- वजनदार नेते असले- आमदार असले खासदार -असले तरी आपणच हे बीड लोकसभा निवडणूक जिंकायचीच. या आढावा बैठकीला जिल्हाभरातील आजी-माजी व शेतकरी किसान संघटनेचे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.भारतीय जवान किसान पार्टीचे अधिकृत उमेदवार अंकुश खोटे यांना बीड लोकसभेची उमेदवारी दिली आहे.

आज बीड जिल्ह्यातील सर्व तालुका अध्यक्ष व आजी-माजी सैनिकांची आढावा बैठक घेत उमेदवारीची घोषणा करण्यात आली. यावेळी राष्ट्रीय अध्यक्ष नारायण अंकुशे, शेतकरी संघटना राष्ट्रीय अध्यक्ष रघुनाथ दादा पाटील, प्रदेश अध्यक्ष पोपट दाते, यांनीही लोकसभेच्या अधिकृत उमेदवाराची घोषणा केली . व सर्व कार्यकर्त्या समवेत त्यांना पक्षाचा बी फॉर्म देण्यात आला. यावेळी जिल्हाभरातील राज्यातील कार्याध्यक्ष प्रमोद विचारे, शेतकरी संघटना कार्याध्यक्ष कालिदास आपटे, त्रिदल कोर कमिटी अध्यक्ष अशोक चौधरी, त्रिदल कोर कमिटी उपाध्यक्ष संजीव फसले, त्रिदल बीड जिल्हाध्यक्ष महादेव बांगर साहेब बीड जिल्हा सल्लागार बळीराम राख, त्रिदल उपाध्यक्ष महाराष्ट्र राज्य समीर पठाण, आष्टी तालुका अध्यक्ष नवनाथ भगत, बीड तालुका अध्यक्ष मधुकर साळवे, गेवराई तालुका अध्यक्ष बळीराम डोंगरे, वडवणी तालुकाध्यक्ष शिवप्रसाद माळवदे, पाटोदा तालुका अध्यक्ष राम तांबे, परळी तालुकाध्यक्ष भारत गीते, माजलगाव तालुकाध्यक्ष विश्वनाथ ठोंबरे, अंबाजोगाई उपाध्यक्ष कमलाकर मालवाड, केज तालुकाध्यक्ष आज अजनुद्दीन शेख, धारूर तालुका अध्यक्ष दत्ता शिनगारे, शिरूर कासार तालुका अध्यक्ष रावसाहेब खेडकर, यांच्यासह बीड जिल्ह्यातील प्रतिष्ठित नागरिक यांनी बीड लोकसभेचे उमेदवार म्हणून अंकुश खोटे यांना मनापासून दिले आहे. त्यांना आता बीड चा खासदार म्हणून संसदेत पाठवायचं आहे. असा निर्धार माजी सैनिकासह शहीद झालेल्या जवानाच्या कुटुंबीयांनी विजयाचा संकल्पच केला आहे या उमेदवारामुळे बीड जिल्ह्यातील मित्रपरिवार व आजी माझी सैनिकाच्या व किसान -शेतकरी कुटुंबीयात आनंद व्यक्त केला जात आहे.

# नाशिकचा तिढा वाढला : भाजप - राष्ट्रवादीच्या साताऱ्याच्या तहावर शिक्कामोर्तब रखडले

**सातारा । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील लोकसभेच्या ४८ मतदारसंघांसाठी निवडणूक ५ टप्प्यात होणार आहे. महाविकास आघाडीने लोकसभेसाठी जागावाटप जाहीर केले आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष २१, काँग्रेस १७ आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष १० जागांवर निवडणूक लढवणार आहे. या पार्श्वभूमीवर महायुतीतील जागा वाटप अद्याप निश्चित झालेले नाही.

राज्यातील तिसऱ्या टप्प्यात ज्या मतदारसंघात मतदान होणार आहे, त्याची अधिसूचना जाहीर करण्यात आलेली आहे. मात्र, महायुतीला अद्याप काही जागांवर तिढा सोडवण्यात यश आलेले नाही. यामध्ये प्रामुख्याने सातारा आणि नाशिक लोकसभा मतदारसंघ चर्चेत आहेत. नाशिकच्या जागेवर अंतिम निर्णय होत नसल्याने साताऱ्याचा देखील तिढा सुटलेला नाही. महायुतीकडून दोन्ही लोकसभा मतदारसंघातील उमेदवार जाहीर केलेले नाहीत. नाशिक लोकसभा मतदारसंघ देणार असाल तर साताऱ्याची जागा भाजपला सोडू अशी भूमिका अजित पवारांच्या नेतृत्त्वातील राष्ट्रवादी काँग्रेसनं घेतली आहे. नाशिक मधून राष्ट्रवादीचे नेते मंत्री छगन भुजबळ निवडणूक लढवतील अशा चर्चा सुरु आहेत. मात्र, या जागेवर सध्या शिवसेनेचे हेमंत गोडसे खासदार आहेत. गेल्या दोन टर्ममध्ये या मतदारसंघातून हेमंत गोडसे विजयी झालेले आहेत. मात्र, या जागेवर उमेदवारी मिळत नसल्याने हेमंत गोडसे सातत्याने मुख्यमंत्री



एकनाथ शिंदे यांची भेट घेत आहेत. शुक्रवारी देखील ते मुंबईला रवाना झाले आहेत. दुसरीकडे अजित पवारांनी देखील या जागेवरुन राष्ट्रवादी काँग्रेसचा उमेदवार निवडणूक लढेल, असे जाहीर केले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पडल्यानंतर अजित पवार यांच्या नेतृत्त्वातील पक्षाचं कर्जत येथे शिबिर झाले होते. अजित पवार यांनी सातारा, बारामती, रायगड आणि शिरुर या लोकसभा मतदारसंघात आपले उमेदवार निवडणूक लढवतील, असे जाहीर केले होते. यापैकी अजित पवारांनी बारामती, रायगड, शिरुर या ठिकाणी उमेदवार जाहीर केले आहेत. दुसरीकडे अजित पवारांना उस्मानाबाद म्हणजेच धाराशिव लोकसभा मतदारसंघात अजित पवारांनी अर्चना पाटील यांना उमेदवारी दिली आहे. सातारा लोकसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडून नितीनकाका पाटील हे इच्छुक होते. मात्र, जागा वाटपाच्या चर्चेत सातारा लोकसभेची भाजपला द्यायची आणि त्याबदल्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला नाशिकची जागा मिळणार असा निर्णय झाला होता. साताऱ्यात भाजपचे संभाव्य उमेदवार उदयनराजे भोसले यांनी प्रचार सुरु केला आहे. मात्र, त्यांची उमेदवारी अद्याप जाहीर झालेली नाही.

### साताऱ्याच्या तहावर शिक्कामोर्तब कधी?


नाशिक लोकसभा मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेसकडून लढवण्यात येईल हे अद्याप अधिकृतपणे जाहीर करण्यात आलेले नाही. हा निर्णय झालेला नसताना दुसरीकडे साताऱ्यात उदयनराजे भोसले यांच्या प्रचारात राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते सक्रीय झालेले नसल्याचं पाहायला मिळत आहे. भाजपने आतापर्यंत ११ वेळा उमेदवारांच्या नावांची घोषणा केली आहे मात्र, साताऱ्याचा उमेदवार जाहीर केलेला नाही. नाशिकचा तिढा सुटल्यानंतर सातारचा उमेदवार जाहीर होणार का हे पाहावे लागेल. राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजप यांच्यातील साताऱ्याच्या तहावर शिक्कामोर्तब झाल्यानंतरच अजित पवारांचे समर्थक प्रचारात सक्रीय होतील, अशी शक्यता आहे.

# नकली असलेली राष्ट्रवादी व शिवसेना ही भाजपासोबत - महेश तपासे

**पुणे । प्रतिनिधी**

आमच्या राष्ट्रवादीला नकली राष्ट्रवादी संबोधणारे अमित शाह कोण अशी संतप्त प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे मुख्य प्रवक्ते महेश तपासे यांनी दिली.

महेश तपासे पुढे बोलताना म्हणाले की, आमच्यातल्या काही नकली नेत्यांना भारतीय जनता पार्टीने या आधीच स्वतःच्या सरकारमध्ये समाविष्ट करून घेतले आहे. त्यामुळे आता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षावर आरोप करण्याचे कुठलेही कारण नसल्यामुळे अमित शहा यांनी शरद पवारांचे कर्तुत्व काय असा अतिशय हास्यस्पद प्रश्न निवडणूक सभेदरम्यान विचारला अशी टीकाही केंद्रीय गृहमंत्र्यांवर केली. पुढे बोलताना महेश



तपासे म्हणाले की, महाराष्ट्रात आल्यावर शरद पवारांवर टीका केली नाही तर मथळे तयार होत नाही आणि म्हणूनच जुमला पार्टीच्या नेत्यांना शरद पवारांवर काहीतरी बोलावं लागतं, परंतु महाराष्ट्राच्या बारा कोटी जनतेला शरद पवारांचे राज्यासाठी काय योगदान आहे याची पूर्ण कल्पना आहे असा टोलाही यावेळी लगावला.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske, Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...

पुणे विशेष

शनिवार दि.१३ एप्रिल २०२४ । पान ७

# परिस्थिती जैसे थे ठेवून प्रशासनाला दहा जूनपर्यंत म्हणणे मांडण्याचे आदेश

## दुर्गा नगर एसआरए प्रकल्पात १०० सदनिकांचा घोटाळा प्रकरण ;उच्च न्यायालयाचा आदेश

**पिंपरी । प्रतिनिधी**

दुर्गा नगर एसआरए प्रकल्पाचे काम पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि झोपडपट्टी पुनर्वसन विभागाने सुरू केले आहे. दुर्गा नगर आणि शरद नगर येथील झोपडीधारकांसाठी ३६० सदनिका बांधून तयार आहेत. त्यापैकी काहीचे वाटप झाले आहे. परंतु दुर्गा नगर येथील झोपडी झोपडीधारकांना डावलून महानगरपालिकेतील झोपडपट्टी पुनर्वसन विभागातील कर्मचारी, अधिकारी, पोलीस व या भागातील पुढारी मंडळी मूळ झोपडीधारकांना डावलून बेकायदेशीररित्या दुर्गा नगर येथील त्यांच्या झोपड्या पाडत आहेत. याबाबत येथील रहिवासी मुमताजबी गफुर जामदार, ज्ञानेश्वर पांडुरंग गारगोटे आणि इतरांनी उच्च न्यायालयात धाव घेतली. उच्च न्यायालयाने या प्रकरणी गंभीर दखल घेत दुर्गा नगर आणि शरद नगर पुनर्वसन प्रकल्पाची परिस्थिती जैसे थे ठेवून झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास दहा जूनपर्यंत म्हणणे मांडण्याचे तसेच तीन महिन्यांत अर्ज निकाली काढण्याचे आदेश दिले आहेत.

या प्रकाराबद्दल दुर्गा नगर आणि शरद नगर येथील झोपडीधारकांचे समन्वयक विलास घाडगे यांनी वेळोवेळी एसआरए अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रशासन आणि पोलिसांशी पत्रव्यवहार केला परंतु दखल घेतली नाही. याबाबत उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली. त्यानंतर एसआरए अधिकाऱ्यांना याबाबत चार आठवड्यात अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते. ३५ झोपड्या बाकी आहेत त्या पाडण्यासाठी विकसक यांनी



स्थानिक गुंड यांना हाताला धरून रात्री सात नंतर झोपड्या पाडण्याचे बेकायदेशीर काम केले आहे. या झोपडीधारकांमध्ये तीव्र असंतोष असून त्यांना त्यांच्या न्याय हक्काची झोपडी मिळालीच पाहिजे यासाठी प्रशासनाचा निषेध करून आंदोलन ही करण्यात आले होते.

उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचे विलास भागवत घाडगे, दीपक हणमंत हलूरकर, बाबासाहेब भगवान गोरे, अब्दुल जमादार, सीता विठ्ठल नांदवते, बाबासाहेब कदम, आतिश दिलीप कदम, प्रशांत दिलीप कदम, प्रमिला पांडुरंग शिंदे यांनी स्वागत केले असून न्यायालय आम्हाला योग्य न्याय देईल अशी भावना व्यक्त केली.

या ठिकाणी प्रशासनाने बोगस सर्वे केला, बोगस नोंदी केले आहेत मृत व्यक्तींच्या नावे बोगस खरेदी दाखवून दुसऱ्याच्या नावे खोटे खरेदीखत केले आहे. दुर्गा नगर मध्ये मूळ झोपडी मालकांमध्ये एकही बोबडे आडनावाची व्यक्ती नसतानाही जवळपास आठ बोबडे नावाच्या व्यक्तींना सदनिका देण्यात आले आहेत. यामध्ये अशोक संदिपान बोबडे, विकास झुंबर पुळवले, सविता अरुण तूरुकमारे हे बोगस असल्याने त्यांची कागदपत्रे तपासली जावीत. तसेच मूळ झोपडीधारक विठ्ठल लक्ष्मण फुटक, पांडुरंग कोंडीबा शिंदे, गोकुळदास उत्तमराव घुले, चांगदेव काशिनाथ तांदळे व इतर हे मृत झाल्यानंतर त्यांच्या नावे बोगस कागदपत्र सादर करून खरेदीदार यांनी शासनाची फसवणूक करून मूळ झोपडीधारकांवर अन्याय केला आहे. याची देखील चौकशी करून संबंधितांवर कायदेशीर कारवाई झाली पाहिजे, असे विलास घाडगे म्हणाले.

# जिल्ह्यातील शस्त्रपरवानाधारकांना शस्त्र जमा करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश

**पुणे । प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाने लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर केला असून जिल्ह्यात फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७४ चे कलम १४४ तसेच शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम १७(३)(ए) व (बी) नुसार छाननी समितीच्या बैठकीत निर्णय झाल्याप्रमाणे जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी लोकसभा निवडणूक सुरळीत, शांततेत व निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी तसेच कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये म्हणून जिल्ह्यात ३३ पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील ३ हजार ३१८ शस्त्रपरवानाधारकांना त्यांच्याकडील ३ हजार ३५९ शस्त्रे सबंधित पोलीस ठाण्यांना जमा करण्याचे आदेश दिले आहेत.

हे आदेश ६ जूनपर्यंत लागू राहतील. संबंधित पोलीस विभागाने शस्त्र परवानाधारकांना त्यांचे परवान्यावरील शस्त्र जमा करण्याबाबतचा आदेश बजावावेत. शस्त्र परवानाधारकांनी अशाप्रकारचे आदेश प्राप्त होताच कोणत्याही परिस्थितीत सात दिवसाच्या आत त्यांच्याकडील शस्त्र जमा करावीत. पोलीस विभागाने शस्त्रे जमा करून घेण्याची व्यवस्था करावी. जमा केलेल्या शस्त्रांचे कोणतेही नुकसान होणार नाही तसेच ज्या स्थितीत शस्त्रे जमा केली होती त्याच स्थितीत धारकास परत करण्याची दक्षता घ्यावी. ६ जून नंतर ७ दिवसाच्या आत संबंधितांना त्यांची शस्त्रे परत करावीत. या आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भारतीय दंड विधान कायदा कलम १८८ अन्वये शिक्षेस पात्र राहील, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# ससून रुग्णालय मधील 'उंदीर' प्रकरणात दोषी कोण? अखेर सत्य येणार बाहेर

पुणे । प्रतिनिधी

ससून सर्वोपचार रुग्णालयातील अतिदक्षता विभागात (आय.सी.यू.) दाखल रुग्णाला उंदराने चावा घेतल्याचा आरोप त्याच्या नातेवाइकांनी केला होता. या रुग्णाचा मृत्यू झाल्याने याप्रकरणी चौकशी समिती नेमण्यात आली होती. या समितीने चौकशी करून आपला अहवाल वैद्यकीय शिक्षण संचालकांकडे सादर केला असून, त्यात रुग्णालय प्रशासनावर कारवाईची शिफारस केली असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

सागर दिलीप रेणुसे (वय ३०) असे मृत्यू झालेल्या रुग्णाचे नाव होते. त्याचा १५ मार्चला रात्री १० वाजता गंभीर अपघात घडला होता. त्यानंतर




त्याला १६ मार्चला रात्री उशिरा ससून रुग्णालयात गंभीर अवस्थेत दाखल करण्यात आले. त्याच्या मणक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्याच्यावर १५ मार्चला शस्त्रक्रिया करण्यात आली. त्यानंतर २९ मार्चला त्याला व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले होते. अतिदक्षता विभागात १ एप्रिलला सकाळी रुग्णाला उंदीर चावल्याची तक्रार नातेवाइकांनी केली होती. त्याच रात्री रुग्णाचा मृत्यू झाला.

सागर रेणुसे याचे शवविच्छेदन ससून रुग्णालयात २ एप्रिलला करण्यात आले. त्यात मणक्याला गंभीर दुखापत झाल्यामुळे त्याचा मृत्यू झाल्याचे समोर आले. चौकशी समितीने शवविच्छेदन अहवालासह इतर बाबींची चौकशी केली. हा अहवाल वैद्यकीय शिक्षण संचालक डॉ. दिलीप म्हैसेकर यांच्याकडे सादर केला आहे. चौकशी समितीने अहवालात रुग्णाच्या शरीरावर उंदीर चावल्याच्या खुणा असल्याचे म्हटले आहे. ससूनच्या प्रशासनावर याप्रकरणी कारवाई करण्याची शिफारसही समितीने केली आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली.

ससून रुग्णालयात रुग्णाला उंदीर चावल्याप्रकरणी चौकशी समिती नेमण्यात आली होती. या समितीने चौकशी पूर्ण करून अहवाल माझ्याकडे सादर केला आहे. या अहवालावर लवकरच कार्यवाही केली जाईल. डॉ. दिलीप म्हैसेकर, संचालक, वैद्यकीय शिक्षण विभाग

# विकासकाकडून विनापरवानगी ८०० झाडांची तोड; ८ लाख रुपयांचा दंड

**मुळशी । प्रतिनिधी**

मालकी क्षेत्रात विनापरवानगी अवैध वृक्षतोड केल्याचे प्रकरण नेरे (ता. मुळशी) येथील विकसकाला चांगलेच महागात पडले. या प्रकरणात वनपरिक्षेत्र अधिकारी तथा वृक्ष अधिकारी पौड (ता. मुळशी) संतोष चव्हाण यांनी तब्बल ८ लाख रुपयांचा दंड बजावला आणि तो वसुलही केला. दत्तवाडी (नेरे, ता. मुळशी) येथील वसुंधरा सामाजिक उन्नती वृक्षलागवड व वृक्षसंवर्धन सहकारी संस्था मर्यादित यांनी मुळशी वनविभागाच्या कार्यालयात त्यांचे मालकी क्षेत्र सर्व्हे नंबर ३८, हिस्सा नं.१ चे एकूण क्षेत्र ०६ हे. ३३.५० आर इतक्या क्षेत्रात त्यांनी सन २०१६ मध्ये लावलेले एकूण ४०० वृक्ष व इतर नैसर्गिकरीत्या उगवलेले



वृक्ष यांची अवैध वृक्षतोड झालेबाबत तक्रारी अर्ज दाखल केला होता. बाबासाहेब भागूजी बुचडे, अतुल रमेश साठे यांचेसह इतर ३०-४० लोकांनी मिळून हे कृत्य केल्याचे तक्रारीमध्ये नमूद केले होते.

वन विभागाचे घोटावडे वनपरिमंडळ अधिकारी श्रीमती प्रज्ञा बनसोडे, कासारसाई नियतक्षेत्राचे वनरक्षक पांडुरंग कोपणर यांनी वनपरिक्षेत्र अधिकारी पौड यांच्या आदेशानुसार जागेवर जाऊन पहाणी केली असता सुमारे ८००-८५० झाडांची तोड झाल्याचे निष्पन्न झाले. पुढील चौकशीसाठी आरोपींना नोटीस बजावली असता आरोपींनी गुन्हा कबूल करून शासकीय नियमाप्रमाणे होणारा दंड भरण्यास तयार असल्याचे सांगितले. वनपरिक्षेत्र अधिकारी पौड (ता. मुळशी) यांनी एकूण ८०० झाडांसाठी प्रतिझाड १००० रुपयेप्रमाणे एकूण ८ लाख रुपये दंड ठोठावला. सध्या या कारवाईची सर्वच स्तरातून चर्चा होत असून मालकी क्षेत्रातील अवैध वृक्षतोड प्रकरणात आजअखेर महाराष्ट्रातील सर्वात मोठी दंडात्मक कारवाई असल्याचे बोलले जात आहे. या कारवाईमुळे मुळशीतील अवैध वृक्षतोड करणार्यांमध्ये खळबळ माजली आहे.

# इंदापुरात चारापीक लागवडीवर भर; चाराटंचाईच्या पार्श्वभूमीवर शेतकरी सतर्क

**बावडा । प्रतिनिधी**

इंदापूर तालुक्यात दुग्धव्यवसाय मोठ्या प्रमाणावर आहे. तालुका दुधाचे आगार म्हणून ओळखला जात आहे. त्यामुळे संभाव्य चारा टंचाईवर मात करण्यासाठी अनेक शेतकर्यांनी मकवान, कडवळ आदी चारा पिकांची लागवड केली आहे.

दुग्धव्यवसाय तालुक्यात मोठ्या प्रमाणावर केला जात असल्याने हिरव्या चार्यास दूध उत्पादकांकडून मोठी मागणी असते. अनेक शेतकरी मुरघासाची लागवड करतात. उन्हाळ्याचे आणखी दोन महिने बाकी आहेत. त्यामुळे हिरव्या चार्याची मागणी कायम राहणार असल्याने मकवान, कडवळ यांची लागवड केल्याचे शेतकरी गणेश घोगरे, अंकुश घाडगे (बावडा), काशिनाथ अनपट (लाखेवाडी), रणजित खाडे (शहाजीनगर) व दूधगंगा दूध संघाचे संचालक



दयानंद गायकवाड (बोराटवाडी) यांनी सांगितले.

उपलब्ध क्षेत्रावर चारा पिकाची लागवड करून आगामी काळात जनावरांच्या चा-याचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न शेतकरी करीत आहेत. यंदा तालुक्यात चा-याची व पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणविण्याची शक्यता आहे. शेतीला जोड म्हणून अनेक शेतकरी दुग्धव्यवसाय करतात. दूध व्यवसायामुळे शेतक-यांना आर्थिक आधार मिळाला आहे. त्यामुळे अनेक शेतक-यांनी पाण्याच्या उपलब्धतेनुसार चारा पिके घेतली आहेत. दरम्यान, सध्या दुधाचे दर घसरल्याने व्यवसाय फारसा किफायतशीर राहिला नसल्याचे निरा भीमा कारखान्याचे संचालक प्रतापराव पाटील (निरनिमगाव), राजेंद्र देवकर (रेडा), राहुल कांबळे (खोरोची), किरण पाटील (चाकाटी) यांनी सांगितले.

# शिरोली खुर्द येथील बालिकेवर हल्ला करणारा बिबट्या अखेर जेरबंद

नारायणगाव; : संस्कृती संजय कोळेकर या दीड वर्षाच्या बालिकेला ठार करणाऱ्या नरभक्षक बिबट्याला पकडण्यासाठी शिरोली खुर्द येथे वन खात्याने पिंजरा लावला होता. या पिंजऱ्यात (दि.१२) पहाटे दोन वाजण्याच्या सुमारास बिबट्या जेरबंद झाल्याची माहिती जुन्नरचे वनक्षेत्र अधिकारी प्रदीप चव्हाण यांनी दिली. पकडलेला बिबट्या नर असून त्याचे वय सुमारे आठ वर्षाचे आहे. त्याला माणिकडोह येथील निवारा केंद्रात हलविण्यात आले आहे.

जुन्नर तालुक्यातील शिरोली खुर्द येथे संपत मोरे यांच्या शेतावर मुक्कामी असलेल्या धनगराची दीड वर्षाची चिमुरडी संस्कृती संजय कोळेकर हिला गुरुवारी (दि. ११) पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास बिबट्याने झडप घालून बाजूच्या उसात घेऊन पसार झाला होता. वन खात्याने तातडीने शोधाशोध केल्यावर अर्धा किलोमीटर अंतरावर असलेल्या एका उसात बिबट्याने तिचा अर्धवट खाल्लेला मृतदेह सापडला होता. घटना घडल्याच्या दिवशी दुपारी तिच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

दरम्यान वन विभागाने पकडलेला बिबट्या हा संस्कृती कोळेकर हिच्यावर हल्ला करणाराच असावा, असा प्राथमिक अंदाज वन विभागाने व्यक्त केला आहे. तथापी अधिकृत दुजोरा शनिवारी मिळू



शकेल, असे संबंधित अधिकाऱ्याने सांगितले. संस्कृतीला ज्या उसात बिबट्या घेऊन गेला होता त्याच्या बाजूलाच लावलेल्या पिंजऱ्यात बिबट्या अडकला आहे. दरम्यान परिसरात अधिक बिबटे असल्याचे स्थानिकांचे म्हणणे असल्याने वन खात्याने १२ पिंजरे परिसरात लावले आहेत. तसेच ट्रॅप कॅमेरेही लावले असून ३० लोकांचे पथक तैनात केले आहे.

जुन्नरचे आमदार अतुल बेनके, विघ्नहरचे अध्यक्ष सत्यशील शेरकर व शरद सोनवणे यांनी घटनास्थळी भेट देऊन संस्कृतीच्या आई-वडिलांचे सांत्वन केले व वन विभागाला अधिक सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या. दरम्यान महिन्यापूर्वी उंब्रज येथील आयुष शिंदे या मुलावर हल्ला केल्यावर बिबट्याला पकडण्यासाठी लावलेल्या पिंजऱ्यात चौथा बिबट्या देरबंद झाला आहे. परंतु आयुषवर हल्ला करणारा बिबट्या कोणता? हे मात्र अद्याप स्पष्ट झाले नाही.

धनगर समाजातील नागरिकांना दररोज बिबट्याचा सामना करावा लागत आहे. मेंढराच्या आशेने बिबट्या दररोजच धनगरांच्या वाड्यावर हमखास येत असतोच. दिवसभर मेंढरं सांभाळायची व रात्री बिबट्याचं राखण करीत राहायचं काय? असा संतप्त सवाल विचारला जात आहे. धनगर मंडळींना स्वसंरक्षणासाठी आवाजाच्या बंदूका देण्यात याव्यात. ही अंमलबजावणी चार दिवसात करावी अन्यथा जुन्नरच्या तहलीस कचेरीच्या आवारात ही सगळी मेंढरं ठेवली जातील, असा इशारा कुलस्वामी पतसंस्थेचे संचालक संतोष घोटणे यांनी दिला आहे.

# 'अंधश्रद्धा निर्मूलन' या विषयावरील कार्यशाळेचे आयोजन

**पुणे । प्रतिनिधी**

महात्मा ज्योतिबा फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून समाजकल्याण विभाग व राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळाचे आर्टस्, कामर्स व सायन्स कॉलेज, लांडेवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने 'अंधश्रद्धा निर्मूलन' या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

कार्यशाळेस सहायक आयुक्त समाज कल्याण विशाल लोंढे यांनी ११ ते १४ एप्रिल या कालावधीमध्ये महात्मा ज्योतिबा फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महापुरूषांची जयंती साजरी करण्यामागचा उद्देश, अंधश्रद्धा निर्मूलन, विद्यार्थी व भावी नागरिक म्हणून आपल्याकडून अपेक्षित असलेली वर्तणूक या विषयावर मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना मतदान करण्याचे आवाहन केले. यावेळी अन्य मान्यवरांनीही आपले विचार व्यक्त केले.

# बारामती एमआयडीसीला महिन्यापुरताच पाणीपुरवठा

भिगवण : : यंदा एप्रिलमध्येच उजनीच्या पाणलोट क्षेत्रात पाण्याचा खडखडाट झाला आहे. त्यामुळे पिण्याच्या व शेतीच्या पाण्याचे काय होणार असा प्रश्न भेडसावत असतानाच उद्योजकही चांगलेच धास्तावले आहेत. सध्याचा पाणीसाठा पाहता बारामती एमआयडीला कसाबसा महिनाभर पाणीपुरवठा होण्याची शक्यता आहे. त्यानंतर पाण्याचा प्रश्न एमआयडीसीला भेडसावणार आहे.

याबाबत कुंभारगाव येथील पाणीपुरवठा करणार्या जॅकवेलची बारामती डेव्हलपमेंट असोसिएशनचे अध्यक्ष धनंजय जामदार, उपअभियंता विजय पेटकर यांच्यासह उद्योजकांनी पाहणी केली. या वेळी जामदार



म्हणाले की, दरवर्षी मे महिन्याच्या दरम्यान पाण्याची टंचाई जाणवते. परंतु, गेल्या वर्षी कमी पाऊस झाल्याने उजनी केवळ ६० टक्के भरले. त्यामुळे जानेवारीपासूनच टंचाई स्थिती जाणवू लागली आहे. सध्या धरणात उणे ३८ टक्केच साठा आहे.

धरणातील कमी पाणीसाठा, तीव्र उन्हाळा व धरणाच्या खालील भागाला पाणी सोडावे लागत असल्याने एमआयडीसीच्या पाणीपुरवठ्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यादृष्टीने उपाययोजनेवर लक्ष केंद्रित करण्यात येत आहे. जामदार म्हणाले, धरणाच्या खालील भागाला १० टीएमसी पाणी देण्याचा निर्णय कालवा सल्लागार समितीत घेण्यात आला. त्यानुसार ५ टीएमसी पाणी सोडण्यात आले. पाच टीएमसी पाणी देणे बाकी आहे. यात वाढ झाल्यास त्याचा परिणाम एमआयडीसीला जाणवण्याची शक्यता आहे. उपअभियंता पेटकर म्हणाले, १५ मे पर्यंत पाण्याबाबत चित्र स्पष्ट होईल. त्यानंतर महामंडळ पर्यायी यंत्रणा उभारून पाण्याची पर्यायी व्यवस्था करेल. पाणीटंचाईमुळे पाणी जपून वापरण्याचे आवाहन त्यांनी केले.

# पुण्यातील एन.म.वि शाळेत शिक्षिकेकडून विद्यार्थ्याला लाथाबुक्क्यांनी मारहाण, व्हायरल व्हिडीओ पाहून पुणेकर संतप्त; कारवाईची मागणी

**पुणे । प्रतिनिधी**

शिक्षणाचे माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुण्यात एक खळबळजनक प्रकार घडला आहे. एका शाळेच्या विद्यार्थ्याला शिक्षिकेने लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. विद्यार्थ्याला मारहाण करणाऱ्या महिला शिक्षिकेविरुद्ध विश्रामबाग पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. या प्रकरणी विद्यार्थ्याच्या पालकांनी आक्रमक पवित्रा घेत संबंधित शिक्षिकेविरुद्ध कारवाई करण्याची मागणी केली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, हा धक्कादायक प्रकार पुण्यातील बाजीराव रोडवरील अप्पा बळवंत चौकातील एन.म.वी शाळेत घडला आहे. पीडित मुलगा इयता ९ वी मध्ये शिकत असून त्याने गोंधळ घातल्याच्या कारणावरुन संतापलेल्या महिला शिक्षिकेने त्याला वर्गात सर्वांसमोर लाथाबुक्यांनी मारहाण केली. मारहाणीचा व्हिडीओ वगातील एका विद्यार्थ्याने आपल्या मोबाईलमध्ये शूट केला. सध्या हा व्हिडीओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे. हा प्रकार पाहिल्यानंतर




पुणेकरांनी संताप व्यक्त केला आहे.

व्हायरल होत असलेल्या व्हिडीओमध्ये, खाकी पँट व पांढरा शर्टमध्ये विद्यार्थी जमिनीवर बसलेला पाहयला मिळत आहे. या विद्यार्थ्याला जाब विचारत शिक्षिका त्याला लाथाबुक्क्यांनी मारहाण करत आहे. 'आहो टीचर सोडाना आता' अशी विनवणी विद्यार्थी शिक्षिकेकडे करत आहे. मात्र, याचा परिणाम संबंधित शिक्षिकेवर झाला नाही. तिने विद्यार्थ्याचा हात पिरगळून त्याच्या तोंडावर फटके मारताना दिसत आहे. वर्गामध्ये असणाऱ्या विद्यार्थ्याने त्याच्या मोबाईलमध्ये हा व्हिडीओ चित्रित केला. त्यामुळे हा प्रकार उजेडात आला आहे.

व्हायरल झालेले व्हिडीओ मुलाच्या पालकांनी पाहिल्यानंतर त्यांना धक्का बसला.

त्यांनी थेट विश्रामबाग पोलीस ठाण्यात धाव घेत मारहाण करणाऱ्या शिक्षिकेविरुद्ध तक्रार दिली. विद्यार्थ्याला बेदम मारहाण करणाऱ्या पूजा केदारी या शिक्षिकेला संस्थेने बडतर्फ करावे, अशी मागणी पालकांनी केली आहे. यापूर्वी देखील या शिक्षिकेने अनेक मुलांना अशाच प्रकारे बेदम मारहाण केल्याची माहिती समोर येत आहे.

cmyk